आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १०२ वा ● गुरुवार दि. १२ सप्टेंबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


## पाकिस्तान हादरला, उत्तर भारतात हाहाकार; दिल्ली, यूपी ते काश्मीरपर्यंत धक्के

नवी दिल्ली : दिल्ली-एनसीआरमध्ये भूकंपाचा जोरदार धक्का बसला आहे. यूपीपासून काश्मीरपर्यंत जमीन हादरली आहे. याचं कनेक्शनक पाकिस्तानशी असल्याचं सांगण्यात येत आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू पाकिस्तानात आहे. भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ५.८ इतकी होती. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीने ही माहिती दिली.बुधवारी दुपारी उत्तर भारत, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. पाकिस्तानातील पेशावर, इस्लामाबाद आणि लाहोरमध्ये भूकंपाचे धक्के बसले. त्याचवेळी भारतात दिल्ली, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, जम्मू-काश्मीरमध्ये धरती हादरली आहे.भूकंप ही एक नैसर्गिक आपत्ती आहे. पण ती का आणि कशी येते हे तुम्हाला माहिती आहे का? पृथ्वीच्या आत ७ प्लेट्स आहेत ज्या सतत फिरत असतात.

## लातूर येथील सैनिकी मुलींचे वसतिगृहात अशासकीय स्वयंपाकी पदासाठी २० सप्टेंबर रोजी मुलाखती

लातूर, (जिमाका) : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय लातूर यांच्या आस्थापनेवरील सैनिकी वसतिगृह लातूर येथे अशासकीय स्वयंपाकी पद तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधन प्रतिमहा रक्कम १३ हजार ९२४ रुपये प्रमाणे भरण्यात येणार आहे.

तरी इच्छूक माजी सैनिक पत्नी, विधवा तसेच इतर नागरी महिला उमेदवारांनी आपल्या अर्ज व सर्व मूळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी २० सप्टेंबर, २०२४ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय लातूर येथे स्वत: उपस्थित रहावे व निवड करण्यात आलेल्या उमेदवारास तात्काळ कामावर घेण्यात येणार आहे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी कळविले आहे.

## जिल्ह्यातील एस.टी. आगारांमध्य प्रवासी राजा दिन, कामगार पालक दिनाचे आयोजन

लातूर (जिमाका) : राज्य परिवहन विभागाच्या प्रत्येक आगारात १५ जुलै, २०२४ पासून प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन साजरा करण्यात येत आहे.

राज्य परिवहन विभागाचे लातूर विभाग नियंत्रक हे प्रवासी राजा दिन (सकाळी १० ते दुपारी २ ) व कामगार पालक दिन (दुपारी ३ ते ५ ) या वेळेत साजरा करण्यासाठी अहमदपूर येथे दिनांक १३ सप्टेंबर २०२४ रोजी, उदगीर येथे दिनांक २० सप्टेंबर २०२४ रोजी, लातूर येथे दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी, निलंगा येथे दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी, औसा येथे दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी उपस्थित राहतील.

## धार्मिक अल्पसंख्याक शाळांनी अनुदान योजनेसाठी १५ सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

मुंबई, : मुंबई उपनगरातील धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित, विनाअनुदानित, कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येते. सन २०२४-२५ या वर्षासाठी अल्पसंख्याक बहुल शाळांनी १५ सप्टेंबर, २०२४ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे.

शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार शाळांनी विहीत नमुन्यात अर्ज करावेत. संबंधित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ७०% व अपंग शाळांमध्ये ५०% विद्यार्थी हे अल्पसंख्याक समुदायातील असणे अनिवार्य आहे. तसेच, संबंधित शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांना शासनाकडून मान्यता मिळालेली असणे आवश्यक आहे. स्वंय-अर्थसहाय्यित शाळा सदर योजनेसाठी पात्र असणार नाहीत, अशी माहिती मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने दिली आहे.

## सोयाबीन, कापसासह शेतमालाला योग्य वाढीव हमीभाव देण्यासह, निर्यातीस परवानगी देण्यासाठीही केंद्र शासनाची अनुकूल भूमिका

मुंबई, : शेतकऱ्यांच्या शेतमालाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे ही राज्य आणि केंद्र शासनाची भूमिका असून सोयाबीन व कापसाचा हमीभाव वाढवण्यासाठी, तसेच निर्यातीस परवानगी देण्यासाठी केंद्र सरकारने अनुकुलता दर्शविली आहे. ऊसाचा एमएसपी वाढवून देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक थांबवण्यासाठी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी कठोर भूमिका घेतली असून त्याचे सकारात्मक परिणाम लवकरच दिसतील. राज्यात ११ हजार ५०० मेगावॅट सौरऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट असल्याने कृषिपंपांना दिवसा वीज मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. महात्मा **(पान ४ वर) ...**




## विजांच्या दुर्घटनेपासून बचावासाठी मोबाईल ॲप संबंधी जनजागृती करा - मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे

अमरावती, : विजांच्या दुर्घटनामुळे शेतकरी, शेतमजूर व पशुधनाचे मृत्यू टाळण्यासाठी व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे. विजांच्या दुर्घटनांपासून बचाव होण्यासाठी मेघदूत, दामिनी-लाईटनिंग, अलर्ट, मौसम व सचेत यासारख्या मोबाईल पचा व अधिकृत संकेतस्थळांच्या वापराबाबत शेतकरी बांधवांना माहिती करुन द्यावी, अशा सूचना स्व. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड. निलेश हेलोंडे यांनी मोर्शी येथील कार्यशाळेत दिल्या.




स्व. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, मोर्शी येथील आर.आर.लाहोटी विज्ञान महाविद्यालय आणि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत अमरावती विभागीय अभ्यासकेंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'मोबाईलव्दारे हवामानाची माहिती शेतकऱ्यांच्या दारी' या विषयाची कार्यशाळा मोर्शीच्या लाहोटी विज्ञान महाविद्यालयात रविवारी (ता.८ सप्टेंबर) संपन्न झाली. त्याप्रसंगी उद्घाटक म्हणून ड. हेलोंडे बोलत होते.

लाहोटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन चौधरी, मुक्त विद्यापीठाचे विभागीय संचालक डॉ. एफ.सी. रघुवंशी, केंद्रीय कापूस संशोधन संस्था,नागपूरचे हवामान शास्त्राचे विशेषज्ञ डॉ. सचिन वानखेडे आदी कार्यशाळेला प्रामुख्याने उपस्थित होते.

या कार्यशाळेत शेतकरी बांधव तसेच युवक-युवतींना विजांच्या दुर्घटनांपासून बचाव होण्यासाठी मेघदूत, दामिनी-लाईटनिंग, अलर्ट, मौसम व सचेत यासारख्या मोबाईल पचा व अधिकृत संकेतस्थळांच्या वापराबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

स्व. वसंतराव नाईक शेती स्वालंतबन मिशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, उपक्रम शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्वपूर्ण कार्यशाळांचे आयोजन याबाबत मिशनचे अध्यक्ष श्री. हेलोंडे यांनी उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की, विजांच्या दुर्घटनामुळे शेतकरी, शेतमजूर व पशुधनाचे मृत्यू टाळण्यासाठी व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतकरी बांधवांना मोबाईलच्या माध्यमातून विविध नैसर्गिक आपत्तीच्या सूचना, हवामान अंदाज व कृषी विषयक सल्ला यासह विजांच्या दुर्घटनांपासून बचावसाठीच्या उपाययोजना संदर्भात तात्काळ माहिती होणे आवश्यक आहे, असे ड. हेलोंडे यांनी यावेळी सांगितले. अशा प्रकारच्या कार्यशाळांच्या नियमित आयोजनातून शेतकरी बांधवांना याबाबत अवगत करुन मार्गदर्शन करावे. हवामान अंदाज व नैसर्गिक आपत्तीची सूचना देणारे विविध मोबाईल प विषयी शेतकऱ्यांना माहिती देवून ते त्यांच्या मोबाईलमध्ये इन्स्टॉल करुन द्यावेत, अशा सूचना श्री. हेलोंडे यांनी कृषी विभागाला दिल्या.

हवामान आधारित कृषी सल्ला याबाबत केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे विशेषज्ञ डॉ. वानखेडे यांनी शेतकरी बांधव व युवक, विद्यार्थ्यांना महत्व पटवून दिले. हवामान अंदाज विषयातील शास्त्रीय संज्ञा समजावून सांगितल्या. विजांच्या दुर्घटनामुळे होणारे मृत्यू, विजांची राज्यनिहाय आकडेवारी, विजांचे प्रकार, विजांच्या दुर्घटनांमध्ये होणाऱ्या मृत्यूची कारणे व नुकसान तसेच यापासून बचावासाठी करावयाच्या उपाययोजना, मार्गदर्शक सूचनांच्या अवलंबसंबंधी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

मोबाईलच्या माध्यमातून विविध नैसर्गिक आपत्तीच्या सूचना, हवामान अंदाज व कृषी सल्ला तसेच विजांच्या दुर्घटनांपासून बचावासाठी विविध मोबाईल प व विविध अधिकृत संकेतस्थळाबाबत डॉ. वानखेडे यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. मेघदूत, दामिनी-लाईटनिंग, अलर्ट, मौसम व सचेत यासारख्या मोबाईल पचा वापर संबंधी त्यांनी माहिती देऊन ते डाऊनलोड करुन वापराबाबत प्रात्यक्षिक दाखविले. उपस्थित शेतकरी बांधव, महिला व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपापल्या मोबाईलमध्ये उपरोक्त प डाऊनलोड करुन त्याच्या उपयोगाबाबत मार्गदर्शकांना आश्र्वस्त केले.

डॉ. रघुवंशी यांनी मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींवर प्रकाश टाकला. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे जास्तीत जास्त प्रश्र्न सोडविल्या जाण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. प्राचार्य डॉ. चौधरी यांनी आर.आर.लाहोटी विज्ञान महाविद्यालय व संस्थेच्या रोजगार निर्मिती व शैक्षणिक उपक्रमांबाबत यावेळी माहिती दिली.

यावेळी मोर्शी परिसरातील शेतकरी बांधव, महाविद्यालयीन विद्यार्थी- विद्यार्थीनी तसेच कृषी क्षेत्रातील गणमान्य व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र शासनाचे ९, १२, १३ आणि १९ वर्षे मुदतीचे १ हजार ५०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई, दि. ११ : महाराष्ट्र शासनाच्या नऊ वर्षे मुदतीच्या १ हजार ५०० कोटी रुपयांच्या रोख्यांची विक्री १६ मे २०१९ रोजीच्या अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून लिलावाने करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कार्यक्रमासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) कर्जरोखे रकमेच्या दहा टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र, एका गुंतवणूकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंतच वाटप करण्यात येईल. १७ सप्टेंबर, २०२४ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल, तर लिलावाचे बीडस् १७ सप्टेंबर, २०२४ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान १८ सप्टेंबर, २०२४ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील. कर्जरोख्याचा कालावधी ९ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी १८ सप्टेंबर, २०२४ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक १८ सप्टेंबर, २०३३ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर लिलावात विक्री केलेल्या रोख्यांवरील दरसाल दर शेकडा कूपन दरा एवढा असेल. व्याजाचे प्रदान प्रतिवर्षी मार्च १८ आणि सप्टेंबर १८ रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (ड्ढ्ठ) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

## 'जल जीवन मिशन' व 'स्वच्छ भारत अभियाना'ची अंमलबजावणी गतीने करावी - मंत्री गुलाबराव पाटील

मुंबई, : राज्यात पाणी पुरवठा योजनांची अनेक कामे जल जीवन मिशन अंतर्गत सुरू आहे. या मिशनअंतर्गत प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचवायचे आहे. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालयांची उभारणी, वैयक्तिक घरकुले शौचालयांची कामे पूर्ण करावीत. जल जीवन मिशन व स्वच्छ भारत अभियानाच्या अंमलबजावणीला गती द्यावी, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.




मंत्रालयात जल जीवन मिशन व स्वच्छ भारत अभियानाच्या आयोजित आढावा बैठकीत मंत्री श्री. पाटील बोलत होते. बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, राज्य पाणीपुरवठा व स्वच्छता मिशनचे व्यवस्थापकीय संचालक ई. रवींद्रन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता प्रशांत भामरे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जल जीवन मिशनच्या सुधारित प्रशासकीय मान्यता तातडीने देण्याच्या सूचना करीत मंत्री श्री. पाटील म्हणाले, सुधारित मान्यता देऊन या योजनांचे कार्यादेश देण्यात यावे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कचरा संकलनाची वाहने मागणीनुसार देण्यात यावी. कचरा विलगीकरण केंद्र, पर्यावरण अनुकूल कचरा प्रक्रिया केंद्राच्या कामांना गती द्यावी. ग्रामपंचायतींना १५ वा वित्त आयोगातून मिळणाऱ्या निधीतून या घटकांवर खर्च झाला पाहिजे, याबाबत ग्रामपंचायतींना सूचना देण्यात याव्यात. जल जीवन मिशन प्रकल्पातील पीएमसी (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) असलेल्या मे. वॅपकॉस कंपनीने त्यांच्याकडील कामे पूर्ण करावीत.

सार्वजनिक कचराकुंडी, घरगुती कचराकुंडी, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प, सांडपाणी व्यवस्थापन, मैलागाळ व्यवस्थापन या कामांचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

## रिपाईच्या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहा- अविनाश जावळे

माजलगाव (प्रतिनिधी)रिपाईचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा सामाजिक न्याय केंद्रीय राज्यमंत्री मा.ना. रामदासजी आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य शक्तिप्रदर्शन व तिसऱ्यांदा मंत्रिमंडळात समावेश केल्याबद्दल त्यांच्या भव्य सत्कार आयोजनाच्या नियोजनासाठी तालुक्याची बैठक दि.१३/९/२०२४ वार शुक्रवार ठिक१२ वा. व्यंकटेश हॉटेल येथे करण्यात आले आहे. तालुक्यातील सर्व शाखा प्रमुख,सर्कल प्रमुख, तालुका कार्यकारणी,शहर कार्यकारीणी व सर्व रिपाई कार्यकर्त्यांनी उपस्थितीत राहावे.या बैठकीस मा.पप्पूजी कागदेसाहेब,प्रदेश युवक अध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष यांचे मार्गदर्शन होणार आहे.तसेच राज्यासह देश पातळीवर रामदासजी आठवले साहेब शोषित,पिडीतांच्या न्याय व हक्कांसाठी संघर्ष करीत अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम दलित पँथर पासून आज पर्यंत रिपाईच्या माध्यमातून करीत आहेत. उपेक्षितांना न्याय देण्यासाठी व विविध योजनाचा लाभ देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सतत संघर्ष करणारे रिपाईचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदासजी आठवलेसाहेब तिसऱ्यांदा केंद्रीय मंत्रीमंडळात निवड झाल्या बद्दल त्यांचा बीड शहरात येत्या ५ आक्टोबर रोजी नागरी सत्काराच्या माध्यमातून रिपाईच्या वतीने भव्य शक्ती प्रदर्शन करण्यात येणार आहे.



यापूर्व तयारीसाठी माजलगाव तालुक्यात ठेवलेल्या बैठकीस तालुक्यातील सर्व रिपाई कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने वेळेवर उपस्थित रहावे,असे आवाहन तालुका अध्यक्ष अविनाश जावळे यांनी केले आहे.

## राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी जाणून घेतल्या विविध घटकांच्या अपेक्षा व संकल्पना

छत्रपती संभाजीनगर,(जिमाका): राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज आपल्या छत्रपती संभाजीनगर दौऱ्यात विविध राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांशी जिल्ह्यातील व मराठवाड्यातील विविध विकास विषयक प्रश्र्नांवर चर्चा केली. तसेच विविध घटकांकडून विकास विषयक अपेक्षा व संकल्पना जाणून घेतल्या.



राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज छत्रपती संभाजीनगर दौऱ्यात सुभेदारी अतिथी गृह येथे विविध राजकीय पक्षाचे नेते, लोकप्रतिनिधी, समाजातील विविध घटक आदींशी चर्चा केली. राज्यपाल यांच्याशी चर्चा करण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खासदार कल्याण काळे, खासदार संदीपान भुमरे, आमदार प्रशांत बंब, आमदार रमेश बोरनारे, माजी खासदार इम्तियाज जलीलआदी मान्यवर उपस्थित होते. तसेच विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी आदी उपस्थित होते.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांच्या समोर मांडण्यात आलेल्या विषयांत प्रामुख्याने पाण्याचे समन्यायी वाटप, समतोल विकास, वैधानिक विकास महामंडळाचे पुनरुज्जीवन यासारखे प्रमुख विषय मांडण्यात आले. तसेच उद्योग विकासासाठी पायाभुत सुविधा विकास, पर्यटन विकासासाठी सुविधांचा विकास यासारखे विषय मांडण्यात आले. मराठवाड्यातील परभणी, हिंगोली आणि बीड यांच्या विकासासाठी विशेषत्वाने उपाययोजना करण्याबाबतही विषय मांडण्यात आले.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सर्व गटांचे म्हणणे ऐकून घेत सर्व मागण्या व विकास संकल्पनांबाबत लक्ष घालण्याबाबत आश्र्वस्त केले.

## डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेसाठी मदरसांनी १५ सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

मुंबई, : डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेअंतर्गत सन २०२४-२५ या वर्षासाठी अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या मुंबई उपनगर जिल्ह्यातील मदरसांनी १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे.



अल्पसंख्याक विकास विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मदरसांचे विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असलेल्या मदरसांना दिला जाईल.

ज्या मदरसांना डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना (Scheme for Providing Quality Education in Madrasa (SPQEM²)) या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत लाभ मिळाला आहे अशा मदरसांना ही योजना लागू राहणार नाही, असे मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## झरोका

एक – ही सत्याची, विकासाची लढाई आहे. महाराष्ट्रच काय सारा भारत देश विकसीत करायचा असल्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे महायूतीचे सत्ताकारण करीत असल्याचा कांगावा भाजपा प्रवक्ते करीत आहेत मग महाविकास आघाडी, इंडिया प्रधानमंत्री मोदीजी आणी महाराष्ट्रातील फडणवीस, शिंदे, दादा पवार यांचे मागे हात धूवून मागे का लागलीय हेच कळत नाही. डोकं बधीर झालंय.

दुसरा – अरे, मोदीजी, फडणवीस, पवार, शिंदे यांच्या नव्हे तर महायूती व महायूती सरकारवर महाविकास आघाडी, इंडिया तूटून पडली आहे. विधानसभा निवडणूकीतूनच सारे कांही कळेल समजलं.

एक – अहो, सारं कांही ठीक चालत आहे. लाडकी बहीणी बरोबरच त्याच तोडीच्या अनेक योजना घोषीत करुन त्या कार्यान्वीत केल्या जात असताना मोदीजी, शिंदे सरकारवर आगफाकड कशाला म्हणतोय.

दुसरा – अरे, महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार जाऊ दे पण आजघडीला पूल, रस्त्याला तडे, नौकरभरती बंद, ईव्हीएम बँक, महाराष्ट्रावर अन्याय, उद्योग राज्याबाहेर पळविणे वगैरे प्रकार चालत आहेत. यामूळे जनता वैतागली आहे. ओरड करते आहे तरी केंद्र व महाराष्ट्र सरकार कल्याणाच्या, विकासाच्या बाता मारीत आहेत मग चिड येणार नाही काय ?

एक – अहो, आजचे काय होते, घडते आहे ते जाऊ द्या. विद्यमान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे गुजरातचे मुख्यमंत्री होते तेंव्हा त्यानी हत्तीवर बाबासाहेब आणी संविधान ठेवून मिरवणूक काढली होती. आणी १२५वी जयंती ही संयूक्त राष्ट्रात साजरी केली. २६ नोव्हेंबर हा संविधान दिन म्हणून साजरा केला जातो आहे हे विरोधकाना लक्ष्यात येत नाही का ? हेच कळत नाही.

दुसरा – अरे, चोरांच्या उलट्या बोंबा म्हणतात ना तेच मोदीजीचे कार्य आहे. बाबासाहेबाच्या जयंतीदिनी गोरगरीब लोक थव्या, थव्याने मिरवणूका काढतात. संविधान दिन पूर्वीपासूनच कॉग्रेस, रिपाइं यूती सरकार पासूनच साजरा केला जातोय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर याची जयंती पूर्वीपासून चिन, जपान, थायलंड, अमेरिका, लंडन, द,आफ्रिका, श्रीलंका, रशिया, वगैरे, वगैरे देशात आणी आता पाकिस्तानातही होत आहे. संविधान आणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खरे वैरी नरेंद्र मोदी व त्यांचे साथीदारच आहेत अशीच कुजबूज आरएसएस वर्तूळात होते आहे, त्याचे काय ?

## काय बोलता राव ?

आजघडीला केंद्र सरकार आणी महाराष्ट्र सरकार मध्ये भेळमिसळ सरकार अस्तित्वात असले तरी उद्याच्या विधानसभा निवडणूकीत समविचारी, धर्मनिरपेक्ष विचारशक्तीचे नेते एकत्रपणे निवडणूक लढविणार असल्याचे संकेत केंद्रात मोदीजीना साथ देणारे बिहारचे मुख्यमंत्री नितिशकुमार आणी माजी मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांच्यातील चर्चेतून स्पष्ट झाल्याचा गवगवा होतो आहे.

**काय बोलता राव,**

अरे, लोकसभा निवडणूकीपूर्वी इंडियात सामील असलेले नितिशकुमार आणी चंद्राबाबू नायडू यानी विद्यमान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याना तारले पण धर्मनिरपेक्ष विचाराची मोडतोड न करता आजही पण उद्याच्या विधानसभा निवडणूकीत धर्मनिरपेक्ष विचाराची कावड खांद्यावर घेवून तीच फडकविणाऱ्या वसा, ध्यास घेतल्याने राजकीय वर्तूळात बदलाचे वारे वाहत असताना दिसत आहे, त्यात महाराष्ट्रात महाविकास आघाडीने कंबर कसलीच आहे, मग बोला दजीबा !

## महामार्ग, द्रुतगती मार्गावर २० किमीपर्यंत टोल माफ, फास्टॅगचीही गरज नाही; जाणून घ्या नवीन नियम

मुंबई : भारतात रस्ते, महामार्ग व द्रुतगती मार्गाचे बांधकाम वेगाने चालू आहे. देशभर रस्त्यांचे मोठे जाळे तयार केले जात आहे. त्याच गतीने देशात वाहने आणि वाहतूकही वाढत आहे. आता या वाहनांना अधिक गती देण्यासाठी केंद्र सरकारने मोठं पाऊल उचलले आहे. रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने जारी केलेल्या नवीन नियमांनुसार तुम्ही महामार्ग व एक्सप्रेस वेवर वाहन चालवत असाल तर २० किमीपर्यंत तुम्हाला कोणताही टोल भरावा लागणार नाही. केंद्र सरकारने ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टिम (उ-एए) असलेल्या खासगी वाहनांना २० किमीपर्यंतच्या टोलमधून सूट दिली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने राष्ट्रीय महामार्ग शुल्क नियम २००८ मध्ये संशोधन केलं आहे. त्यानुसार केंद्र सरकारने जीपीएस आधारित टोल प्रणालीला मान्यता दिली आहे. ज्या वाहनांमध्ये जीपीएस प्रणाली असेल त्या वाहनांना आता टोल नाक्यांवर थांबावे लागणार नाही. तसेच त्यांना फास्टॅगचीही गरज भासणार नही. नवीन सॅटेलाइट आधारित प्रणालीद्वारे केवळ वाहनांवरील नंबर प्लेटच्या मदतीने टोल टॅक्स कापला जाईल. वाहन महामार्गावर किती किलोमीटर चालवलं आहे त्यानुसार टोल कापला जाईल. या वाहनधारकांना टोल नाक्यावर थांबावं लागणार नाही, त्यांना फास्टॅग बाळगण्याची आवश्यकता नाही, तसेच रोख पैसेही द्यावे लागणार नाहीत. हे वाहनधारक कोणत्याही अडथळ्याशिवाय सुसाट प्रवास करू शकतात. नवीन प्रणालीमुळे जीपीएसद्वारे वाहनधारकांकडून टोल वसूल केला जाईल. जीएनएसएससह सुसज्ज असलेल्या खासगी वाहनांना सरकारने २० किमीपर्यंतच्या टोल टॅक्समधून सूट दिली आहे. नवीन नियमानुसार महामार्ग व द्रूतगती मार्गावर वाहनांनी जितका प्रवास केला असेल तितकाच त्यांच्याकडून टोल टॅक्स वसूल केला जाईल.

# एवढा उमाळा कशासाठी ?

### संपादकीय...

मणिपूर जळते आहे, अन्याय, अत्याचाराने धगधगते आहे. विरोधी पक्ष नेत्यांना जाण्यास मज्जाव केला जातो. पत्रकाराना बंदी आहेच. मणिपूर हा अदिवासी भाग असल्याने जात, धर्म हा योग योगायोगाने आलाच त्यात हिंदूत्ववादी विचारी कार्यकर्त्यानी तिथं भाजपाचा झेंडा फडकावला, निवडणूकीपूर्वी, निवडणूकीनंतर आणी मागील वर्षी मणिपूर दंगल झाली त्यावेळीही भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे तिकडे फिरकले नव्हते आणी विरोधकानाही फिरकू दिले नव्हते पण आज रोजी एकंदरीत आश्चर्य वाटणारी बाब म्हणजे राष्ट्रीय स्वंयसेवक संघ्याच्या मोहन भागवत यानीच मणिपूर प्रकरणी तात्काळ कारवाई करुन परिस्थिती आटोक्यात आणावी असे फर्मान सोडले तरीही त्या मोहन भागवत यांच्या उपाळ्या बाबतीत प्रधानमंत्री कसे काय शांत बसू शकतात अशा या प्रासंगिक, नैसर्गीक आपत्तीप्रकरणी आपण कोणाला काय म्हणून बोलावे म्हणून शांत असले तरी मणिपूर प्रकरणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याना एवढा उमाळा कसा काय आला यातील काय गौडबंगाल आहे, या संदर्भात देशभरात उलटसूलट लोकप्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे.

सत्तेची गुर्मी चढल्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या, मोहन भागवत यांच्या आवाहनाला, आदेशाला जूमानत नव्हते. स्वतःच विश्वगुरु बनण्याची भाषा करीत होते, त्यामूळे मागील लोकसभा निवडणूकीत आरएसएसने कानाडोळा केला होता त्यामूळे आरएसएस प्रणीत भाजपाला बहूमतापासून दुरु राहावे लागले आणी धर्म निरपेक्षवादी चंद्राबाबू नायडू आणी नितिशकुमार यांची संगत करुन सत्ता कायम ठेवावी लागली पंरतू विधानसभा निवडणूकीत असे तसे घडू नये म्हणून अदिवासी मणिपूर प्रकरणी लक्ष्य केंद्रीत करुन जनते समोर गेल्यास प्रामुख्याने महाराष्ट्र ही भाजपाच्याच ताब्यात राहील यासाठीच मोहन भागवत यांचा हा कांगावा असावा अशी ही धूसपूस होताना दिसते आहे.

राष्ट्रीय स्वंयसेवक संघ हा भाजपाच्या माध्यमातून सत्ताकारण करीत असला तरी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे मनमानी कारभार, लोकशाही आडून हूकूमशाही आणी सहमती, सहकार्याची भुमिका बाजूला ठेवून वटहूकूमी कारभार करण्यासंदर्भात मोहन भागवत नाराज होते आहेतच त्यामूळे विधानसभा निवडणूकीतही मीच मी किंवा मन मानी होऊ म्हणून मणिपूरच्या संदर्भातून महाराष्ट्रातील घडत असलेल्या अन्याय, अत्याचार प्रकरणी लक्ष्य केंद्रीत करुन एकहाती सत्ता येण्यासाठी आरएसएसचे भागवत हे विधानसभा निवडणूकीवर लक्ष्य केंद्रीत करीत असावेत अशी ही राजकीय वर्तूळात उलटसूलट प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे.

वास्तविक पाहाता विधानसभा निवडणूकीच्या संदर्भाने भाजपा, राष्ट्रीय स्वंयसेवक संघाला महाराष्ट्र हा आपल्याच ताब्यात यावा अशी भावना असली तरी भाजपा, फूटीर शिंदे, सेना आणी राष्ट्रवादी कॉग्रेसचे बंडखोर अजित पवार या त्रिकूटाचे सरकार असले तरी आगामी विधानसभा निवडणूकाच्या निमित्ताने अजित पवार यानी मी माझा पक्ष धर्म निरपेक्षवादी आहे. केवळ राज्याच्या विकासासाठीच सहमतीचे राजकारण, सत्ताकारण करीत आहोत आमच्या हक्काच्या जागा आम्हाला द्या. तूम्ही तूमचे निर्णय घ्या असे स्पष्ट केल्याने देवेंद्र फडणवीस नव्हे भाजपाश्रेष्ठीचे, भागवताचेच धाबे दणाणल्यानेच राष्ट्रीय स्वंय सेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यानी मणिपूरचा विषय पूढे करुन महाराष्ट्र सरकार आणी भाजपानेत्याना महाराष्ट्रातील अत्याचाराच्या संदर्भात दक्ष राहाण्याचा सल्ला दिला असावा पण ते कोण लक्ष्यात घेणार असा सवाल अनुत्तरीतच राहातो हे एक न सुटणारे कोडे वाटते.

वास्तविक पाहाता सर्वच राजकीय पक्षाचे तळ्यात ना मळ्यात अशी अवस्था झाल्याने महाविकास आघाडीला फडणवीस, शिंदे, पवार तोंड`दवू शकत नसल्यानेच आरएसएसच्या मोहन भागवत याना उमाळा आला असावा एवढेच !

# उत्सवा बरोबर पर्यावरणाचा विचार आपण करणार आहात का ?

कोणताही उत्सव आंनदीत वातावरणात साजरे करणं आवश्यक आहे. त्या निमित्ताने सर्व जाती धर्मातील लोक एकत्रितपणे येत असतात.विचारांची देवाणघेवाण होत असते. माझा शेतकरी बंधू भगिनींचे आयुष्य भर काळ्या आईची रात्रंनदिवस सेवा करून. संपूर्ण देशातील जनतेचे पालनपोषण करण्याची जबाबदारी सर्वस्वी त्यांनी स्वीकारलेली आहे.आणि ती सातत्याने पार पाडण्याचे कार्य करीत आहेत.उत्सवाच्या निमित्ताने घरामध्यील झाडलोट करून स्वच्छता होत असते.आंनदी व उत्साही वातावरण निर्माण होऊन.त्या निमित्ताने सर्व सामान्य शेतकरी,कष्टकरी, मोलमजुरी करणाऱ्यांच्या लेकरा,बाळांना वेगवेगळ्या प्रकारचे गोडधोड पदार्थ करून घालण्यांची संधी आईवडीलांना मिळत असते.पै पाहूणे एकमेकांच्या घरी येणं जाणं होतं असते.पुर्वी सणवार साजरे व्हायचे.परंतू पर्यावरणाला कोणताही धोका किंवा हानी पोहोचणार याची कटाक्षाने दक्षता घेतली जात होती.पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तंतोतंत विचार करत असतं.नागपंचमीचा उत्सव साजरा करण्यासाठी नागपंचमीच्या उत्सवाला मातीच्या चिकला पासून नागोबाची मुर्ती बनविली जाऊन तिची पुजा केली जात होती.पुजे नंतर त्या मुर्तीचे पुन्हा मातीतचं रुपांतर होत होते.

आपल्या देशाला इंग्रजाच्या गुलामगिरीतून मुक्त करण्या करीता समाजाला एकत्रित करून समाजाचे प्रबोधन करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणपती उत्सव साजरा करायला सुरुवात केली.गणपतीची मुर्ती ही (मातीच्याच) शाढू पासून बनवली जात होती.मुर्ती आकाराने लहान असल्यामुळे आणण्यासाठी पुज्या अर्चा करण्यासाठी.तसेच गणपतीच्या मूर्तीचे वित्सर्जनाला घेऊन जाण्यासाठी सोयीयीचे ठरतं होती.मुर्ती ही संपूर्ण नैसर्गिक रंगा पासून रंगवलेल्या असायच्या.गणपती शाढू पासून बणविलेले असल्याने मुर्तीचे विसर्जन केल्यानंतर लगेचच पाण्यात विरघळून जात होत्या.नैसर्गिक साहित्यांचा वापर करून सजावट केली जात होती.वाद्ये ही साधी कमी आवाजाची असायची.त्यामुळे कोणत्याही प्रकारचे ध्वनिप्रदूषण होत नसायचे.सर्व सामान्य जनतेला कोणत्याही प्रकारचा उत्साहा पासून त्रास किंवा उपद्रव होत नव्हता.

कोणत्याही प्रकारची मनुष्य हानी होणार नाही. किंवा पोहोचणार याची कटाक्षाने दक्षता घेतली जात होती.त्या वेळी भरपूर प्रमाणात पाऊस पाऊस पडत असल्याने नद्यांना महापूर येत होता. विसर्जित केलेल्या गणपतीचं.मातीत रुपांतर होऊन लगेचच मुर्ती पाण्यात विरघळून मातीचा गाळ पाण्याच्या प्रवाहाने वाहून जात असायचा.गणपती विसर्जन केल्यानंतर पाण्याची पातळी कमी झाल्याने अस्ताव्यस्त पडलेल्या मुर्त्या पहावयास मिळत नव्हत्या. कोणाच्या ही भावना अनावर होत नव्हत्या त्यामुळे पर्यावरणाला हानी पोहोचत नव्हती.घरगुती पध्दतीने उत्सव साजरा केला जात होता. पुर्वी गांवागांवात तरुण मंडळ स्थापन झालेली नव्हती.मंडळांची संख्या अगदीच नगण्य होती.त्यावेळची तरुणाई पुर्णपणे शाळा,कॉलेज,अभ्यास,नोकरी आणि शेती,व्यवसाय, काम धंद्यात,व्यस्त असायची.मोकळा वेळ जास्त प्रमाणात मिळत नव्हता. तरुण मंडळांचा मुख्य उद्दिष्ट हा असला पाहिजे.तरुणपिढी कुठेतरी भरकटत जाऊन.त्यांचे जीवन उद्ध्वस्त होऊ नये.म्हणून गावातील सर्व तरुणांनी एकत्रित येऊन.दस की लाकडी एक का बोजा होऊन. तरुण शक्तीचा उपयोग गावातील सर्व सामान्य जनतेच्या विकास करण्यासाठी.विविध प्रकारचे उपक्रम राबविण्याचा सातत्याने प्रयत्न केला पाहिजे.उदा.देशातील भावी पिढी सुसंस्कृत,अज्ञाधारक घडविण्यासाठी,समाज प्रबोधनासाठी,मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी,अंधश्रद्धा निर्मूलनासाठी,भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी,व्यसनमुक्तीसाठी,स्पर्धा परीक्षेसाठी,ग्रंथालयासाठी,वाचनालया साठी,गरीब हुषार मुलांच्यासाठी,नैसर्गिक संकटात सापडलेल्या लोकांना मदत करण्यासाठी,रक्तदान शिबीरासाठी,इत्यादींसाठी तरुण मंडळांनी संघटीत होऊन. विचार करून प्रत्यक्षात कृती केल्यास गांवांची,तालुक्यांची,जिल्हांची राज्यांची,संपूर्ण देशांची प्रगती झाल्या वाचून राहणार नाही.आणि आपला देश महासत्ता झाल्या शिवाय राहणार नाही

सध्याच्या तरुणांना म्हणावा तसा रोजगार किंवा काम धंदा उपलब्ध नसल्याने भरपूर प्रमाणात बेकारी वाढलेली आहे.गांवागांवात गणपती उत्सव साजरा होत असल्याने. गणपती उत्सव साजरा करण्याच्या निमित्ताने गल्लोगल्ली तरुण मंडळांची स्थापना मोठ्या प्रमाणात केली जाऊ लागली आहे.गणपती उत्सव हा लोक वर्गणीतून साजरा होतो आहे.पुर्वी स्वइच्छेनुसार लोक वर्गणी जमा केली जात होती.कोणावरही कोणत्याही प्रकारच्या सक्तीचा दबाव तंत्राचा वापर केला जात नव्हता.वर्गणीसाठी वादविवाद केले जात नव्हते.जमलेल्या वर्गणीतून एकमेकांशी मोकळेपणाने चर्चा करून जमलेल्या वर्गणीतून आनंदाने गुण्यागोविंदाने उत्सव साजरे केले जात होते. कोणत्याही प्रकारचे संघर्ष करतं नव्हते.एक मेकांना समजावून घेतले जात होते. कोणत्याही प्रकारचा भांडण,तंटा,केला जात नव्हता.पर्यावरण पुरक मुर्त्या बणवून उत्सव साजरा केला जात असे.

आजकाल तरुण मंडळांची संख्या ही झपाट्याने वाढत चालली आहे.मंडळांचा अध्यक्ष पदासाठी चढाओढ सुरू झालेली आहे.याच्या पाठीमागे लोकप्रतिनिधींचाही हस्तक्षेप असल्याचे दिसून येते.सध्या स्वतःच्या इच्छेनुसार वर्गणीतून उत्सव साजरा करण्याची पद्धती लोप पावत चाललेली दिसून येते आहे.सध्या गणपतीच्या मूर्त्या प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्याचं बणवलेल्या जात आहेत. मुर्तिच्या आकारमानाच्या जणू काही स्पर्धाच मंडळांच्या मध्ये लागलेल्या पहावयास मिळताहेत. जेवढ्या मोठ्या मुर्त्या असतील. त्याचा वाहतूकदारांना किंवा सर्व सामान्य जनतेला.गंभीर समस्यांचा नाहक त्रास सहन करावा लागतो आहे.लोकवर्गणीतून उत्सव साजरा केला जात असल्याने लोक वर्गणीसाठी सक्तीने वसूल करण्यात येत असल्यामुळे सर्व सामान्य माणसाला त्यांच्या गरीब परिस्थितीमुळे अनेक प्रकारच्या प्रसंगांना सामोरे जावे लागत आहे. शहरांमध्ये तरी गणपती उत्सव आला म्हणजे शक्तीच्या वर्गणीमुळे व्यापऱ्यांना जीव मुठीत घेऊन.भयभीत होऊन धंदा करून दिवस काढावे लागतात.या तरुण मंडळांच्या पडद्या मागून लोकप्रतिनिधींचा पाठिंबा किंवा आशीर्वाद असतो. की काय अशी दाट शंका वाटते. त्यांच्या आशिर्वादामुळेच तरुण मंडळांची स्थापना केली जाते.बळजबरदस्ती करून वर्गणी वसूल केली जात आहे. यामुळे असं म्हणावेसे वाटते.

जय देव जय देव जय मंगलमुर्ती!
गणपती उत्सव आला म्हणजे मंडळ जागे होती!
वर्गणीच्या नावावर खंडणी वसूल करती!
जमलेल्या वर्गणीतून पार्ट्या करती!
एक मेकामध्ये गैरसमज होऊन भांडणं तंटा करती!
त्यांच्यातून एक मेकामध्ये तलवार हल्ला करती!

उत्सवातून जे आनंदी वातावरण निर्माण होतं असते.ते निराश जनक वातावरण होऊन त्याला मानवता दृष्टीकोनातून धोका पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही.

गणपती उत्सव साजरा करण्यासाठी तरुण मंडळांच्या मध्ये मुर्तीच्या आकारामध्ये चढा ओढीच्या स्पर्धाचं सध्या लागलेल्या आहेत.या परिस्थितीमुळे दिवसेनदिवस चिंतनाचा विषय बनलेला आहे.त्या मुर्त्यांची वाहतूक करीत असताना येणाऱ्या अनंत अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.मुर्त्यांच्या कांही अवयवांना इजा पोहोचतं असल्याने.समाज्यांमध्ये मांडला जाणारा भावनेंचा बाजार मांडून. त्यातून होणाऱ्या समाजातील जाती धर्माच्या नावाखाली दंगली घडवून आणल्या जातात.त्या दंगलीतून.लोकप्रतिनिधी स्वतःसाठी राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न केला जातो आहे.दिवसेंनदिवस मुर्त्यांची संख्या वाढत चालेली आहे.सदरच्या मुर्त्या प्लस्टर ऑफ पॅरिस पासून तयार केलेल्या असून.त्यांना रंगवण्यासाठी वापरले जाणारे रंग हे नैसर्गिक नसून ते पुर्णपणे रासायनिक रंग वापरले जात आहेत. सदरचे रंग सजीव प्राणी मात्र्यांना हानीकारक आहेत.सदरच्या मुर्त्या ह्या पाण्यात विघटन होत नसल्यामुळे पाणी दुषीत होऊन प्रदूषित झाल्याने पर्यावरणांचा र्हास होतो.संजीव प्राण्यांच्या जीविताशी खेळ खेळला जात आहे.याचा विचार आपण सुज्ञ नागरिक या नात्याने करणार आहात का नाही.पाणी म्हणजे जीवन आहे.ते दुषीत होऊ नये म्हणून.आपण दक्षता घेणार नाही. तर कोण घेणार.?

माझ्या काळ्या आईची रांपत्रनदिवस शेवा करून जगाच्या अन्नधान्य पिकवनार्या शेतकरी बांधवांना शेतीसाठी दिवसाची लाईट उपलब्ध होत नाही ज्या वेळी लाईट उपलब्ध होईल त्यावेळी जीव धोक्यात घालून रात्रीच्या वेळी पिकांना पाणी पाजण्या साठी जावे लागते.म्हजेच ज्या गोष्टींना प्राधान्य दिले पाहिजे त्या शासकीय स्तरावरून मिळत नाही.हे सर्व सामान्य जनतेच्या दृष्टीकोनातून आणि देशाच्या दृष्टीकोनातून दुर्दैवी घटना म्हणावी लागेल! कारण शेतकरी हेच सर्व सामान्य जनतेच्या भुकेची आग विझवू शकतो. हे सर्वांना माहिती असून ही डोळस असतांनाही अंधळ्याची भुमिका घेणे ही राजकीय खेळी.लोक प्रतिनिधींची मतासाठी नियोजित खेळी असल्याचे दिसून येते.वर्षभरातील सर्व उत्सव साजरे करण्यासाठी मुबलक प्रमाणात लाईट उपलब्ध करून दिली जाते.त्यावेळी लाईटची टंचाई कोणत्याही प्रकारची भासत नाही.उत्सवाच्या वेळी आणि वित्सर्जनाच्या वेळी विविध प्रकारची वाद्य वाजवून मिरवणूक काढली जाते.डॉल्बीच्या,डिजेच्या कर्कष आवाजाने काही ठिकाणी घरांच्या भिंती पडल्या.काही ठिकाणी घर पडलेल्या अशा अनेक घटना घडल्या आहेत.काही माणसांच्या कानांचे पडदे फाटून बहिरेपणा आलेला आहे.लेझर किरणांचा दुष्परिणाम होऊन काहीचे डोळे निकामी होऊन काहीना कायमचा आंधळेपणा आलेला आहे. विसर्जनाच्या वेळी काहीना पाण्यात बुडून अपघाती मृत्यूला सामोरे जावे लागले आहे.विद्युत वाहक खांबावरील तारांना स्पर्श होऊन आग लागण्याची तर काहीना शॉक लागून काहीचे जीवन संपुष्टात आल आहे.नदी,नाल्यात, ओढ्यात,समुद्रात विसर्जित केलेल्या मुर्त्या पाण्याची पातळी कमी झाल्याने त्या उघड्यावर अस्ताव्यस्त पडलेल्या असतात. त्या देवतांची झालेली विटंबना परिस्थिती पाहून मनाला वेदना झाल्या वाचून राहतं नाहीत.

उत्सव साजरे करतांना आपण मानवतेच्या दृष्टिकोनातून या एकविसाव्या शतकात, विज्ञान युगात विवेकवादी होऊन विचार करणार आहोत की नाही. हा खरा प्रश्न्न निर्माण होतो.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पर्यावरण आणि पाणी प्रदूषण रोखण्यासाठी प्रथमच उपक्रम हाती घेतला.अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या वतीने आणि परिवर्तनवादी संघटनांच्या वतीने पाणी प्रदूषित होऊ नये म्हणून प्रबोधन करण्यासाठी प्रथम शाळा,कॉलेज, ग्रामपंचायती मध्ये,महिला मेळाव्यात,प्रत्यक्ष जाऊन त्यांचे प्रबोधनातून विचारांचे परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न केला.कोणत्याही चांगल्या कामाची सुरुवात करताना समाजाचा रोष पत्करावाचं लागतो. कारण कित्येक पिढ्यान पिढ्यांपासून चालत आलेल्या रुढी परंपरा असतात.त्या पटकन घालवणं फार कठीण काम असते.

मनुवादी विचार श्रेणीने प्रेरित होऊन काम करणाऱ्या संघटनांच्या बरोबर अनेक प्रकारच्या प्रसंगांना,संघर्षाना सामोरे जावे लागले.कारणं त्यांचा या गोष्टीला कट्टर विरोध होता.तो सर्व विरोध सहन करतचं आम्ही कार्यकर्ते पंचगंगेच्या नदी काठावर उभं राहून शांतीपुर्वक लोकांना हात जोडून विनंती करत होतो.अनेक वर्षे सातत्याने प्रयत्न केल्यावर काही सुज्ञ नागरिकांना आमचे विज्ञानवादी विचार हळूहळू पटू लागले.आणि लोक स्व इच्छेनुसार विसर्जित केलेल्या मुर्त्या दानं द्यायला सुरुवात झाली.दान देत असताना.मनुवादी लोकांच्या कडून कडाडून विरोध केला जात असे.त्यावेळी मुर्त्या दानं देणारीच व्यक्ती प्रती उत्तर देत होती.की आमची मुर्ती दान द्यायचची की नाही.हा आमचा अधिकार आहे.असं ठणकावून मनुवाद्यांना सांगत होते. तिथेच आमचा विजय झाला.दान घेतलेल्या मुर्त्या नंतर महानगरपालिकेच्या सहकार्याने रंकाळा तलावाच्या बाजूला मोठ मोठ्या खाणीमध्ये विसर्जित केल्या.जेणेकरून पाण्याचा कोणत्या ही कामासाठी वापर केला जात नाही अशा ठिकाणी.पाणी ही प्रदुषित होतं नाही.खाणीही भरुन निघत होत्या.तसेच मुर्ती बरोबर निर्माल्य गोळा एकत्रितपणे करून शेतकऱ्यांना शेतीसाठी सेंद्रिय खत तयार करण्यासाठी प्रयत्न केला.हा उपक्रम संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी हाती घेऊन यशस्वीपणे राबविला.आज या विचारातून प्रेरणा घेऊन. लोकांनी लोक चळवळ म्हणून देश पातळीवर रुजू लागलेली पाहून मनाला वेगळाच सुखद आनंद आणि समाधान मिळतो.देशाच्या दृष्टिकोनातून किंवा सर्व सामान्य जनतेच्या दृष्टीकोनातून विज्ञानवादी उपक्रम राबविण्याचा सातत्याने सर्वांनी प्रयत्न करणं गरजेचे आहे.

जे कलाकार मुर्ती बनवितात त्यांच्याकडे भरपूर प्रमाणात विक्री न झालेल्या मुर्त्या वर्षभर शिल्लक राहतात.कांही मुर्त्यांची मोडतोड झालेली असते.त्याच मुर्त्या दुसऱ्या वर्षी पुन्हा दुरुस्त करून विकल्या जातात.मग आपल्या घरी पुजलेली मुर्ती विसर्जित न करता कायमचीच घरी पुजा करुन ठेवली. नंतर तीच मुर्ती दरवर्षी प्रमाणे किरकोळ स्वरूपात सजावट करुन पुजली तर चालणार नाही का घरातील आपले बाकीचे देव देव घरी ठेवतोच ना.! कांही ठिकाणी मुर्तिंच्या अवयवांची मोडतोड होतं असते.तेथे मात्र कोण भावनेचा बाजार मांडत नाहीत.यावरुन हे स्पष्ट होते की संधी साधू मनूवादी विचारांनी प्रेरित होऊन जाती धर्माच्या नावाखाली दंगली घडवून आणण्याचा सातत्याने प्रयत्न या देशात नेहमीच केला जातो आहे.

उत्सवाच्या निर्माण कर्त्या तुझ्या लेकरांना निर्माण केलेल्या धारकांनी,सनातनी, मनुवादी लांडगे वेशांतर करु लागले.कोल्हांना घेऊन केव्हा घुसखोरी व त्यांची दिशाभूल करु लागले.हे कळलेच नाही.तुझ्या लेकरांनी निर्माण केलेल्या समतेच्या, प्रेमाच्या,विवेकाच्या या भुमित द्वेष,तिरस्कार,हिंसाचार,अविवेकी,धर्मांधंता,इत्यादींचे तण ते पेरू पहात आहेत.कांहीजन त्याला बळी पडत आहेत.खरोखरचं काळजी वाटावी अशी परिस्थिती सध्या निर्माण झालीय.सर्व सामान्य माणसाला सत्य,असत्य, चांगले काय? वाईट काय? यांतील फरक समजून येतं नाही.कालबाह्य,कालसापेक्ष, विवेक,अविवेक,श्रध्दा, अंधश्रद्धा,निर्मळ भक्तीचा बाजार,कर्मकांडे,खरं,खोटं यातील फरक समजण्याची सद्सदविवेक बुध्दी दे.पर्यावरणाच्या चरणीं वंदन करतो.

पृथ्वीच्या निर्मिती पासून आजपर्यंत कोणी देव पाहिला नाही. कोणाला दिसलाही नाही.आणि कोणाला दिसणार ही नाही.तरी देखील निर्जीव दगडावर दुध,दही,तुपाचे नाव्हानं घालतो.आणि माणसाला मात्र जाती,धर्माच्या नावाखाली लाथाडून मारतो.सांगा ना? बांधवांनो त्यांनी काय गुन्हा केला.कोणत्याही प्रकारची संकटे आली की ! वेळोवेळी माणूसचं संकटाच्या वेळी मदतीसाठी धावून आलेला आहे.जन्माला येताना प्रथम माणूस म्हणून आलो आहे.जात धर्म जन्मा नंतर आपणास शिकवली जाते.संत गाडगेबाबा स्वःया हातात झाडू घेऊन स्वच्छता करीत होते.किर्तनातून समाजाला स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत होते.ते म्हणायचे वेड लागले.जगाला! देव म्हणती दगडाला.आरे दगडात देव शोधण्या पेक्षा माणसात देव शोधा.

३३ कोटी देवतांच्या उत्सव साजरे करत असतांना लोकं चळवळीतून सर्व सामान्य जनतेचे प्रबोधन करणे आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून समाजाच्या हितासाठी विविध कल्याणकारी योजना राबविल्या पाहिजेत.हाच उत्सवा मागचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे.हे सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून मुर्त्या ह्या पुर्वी प्रमाणेच आकाराने लहान असाव्यात.आणि त्या पर्यावरण पूरक शाडू पासून तयार केलेल्या असाव्यात.या साठी शासनाने लक्ष घालून नियमावली तयार करण्यासाठी समाज हिताच्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत.प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तीच्या ऐवजी पुर्वी प्रमाणेच पर्यावरण पुरक मुर्त्या तयार करण्यासाठी शासनाने निर्णय घेणे. जनतेच्या दृष्टीने योग्य आहे.पर्यावरण आणि पाणी प्रदूषण रोखण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत.

**देशमुख पी.आर.९९२११११९५५,**
**मु-चिंचणे,पो-राजगोळी खुर्द,तालुका-चंदगड,जिल्हा कोल्हापूर.**

# शासनाच्या योजना आदिवासी समाजातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहचणे आवश्यक - आंतरसिंग आर्य

धुळे (जिमाका वृत्तसेवा) : केंद्र व राज्य शासनामार्फत



आदिवासी बांधवांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहे. या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत अधिक गतीने पोहोचल्यास त्यांच्या जीवनात परिवर्तन होण्यास निश्रि्चतच मदत होईल. असे प्रतिपादन राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाचे अध्यक्ष आंतरसिंह आर्य यांनी केले.

राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाचे अध्यक्ष आंतरसिंह आर्य हे दोन दिवसीय धुळे जिल्हा दौ–यावर आले होते. यावेळी जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या समस्यांबाबत आढावा बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात संपन्न झाली, यावेळी ते बोलत होते. या बैठकीस जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, उपवनसंरक्षक नितिनकुमार सिंग, परिविक्षाधीन अधिकारी डी. सर्वानंद, महापालिका आयुक्त अमिता दगडे पाटील, खाजगी सचिव राजीव सक्सेना, आयोगाचे संशोधन अधिकारी अंकितकुमार सेन, वरिष्ठ अन्वेषक गोवर्धन मुंडे, राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाचे सल्लागार,अमरीतलाल प्रजापती, दौरा समन्वयक नामदेव केंद्रे, निवासी उपजिल्हाधिकारी नितिन गावंडे, उपजिल्हाधिकारी नितिनकुमार मुंडावरे, संदीप पाटील, महेश शेलार, प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील यांचेसह जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

श्री. आर्य म्हणाले की, आदिवासी समाजाच्या जल, जंगल, जमीन बाबत ज्या समस्या आहेत. त्या प्राधान्याने सोडविल्या पाहिजेत. आदिवासी भागात शिक्षण, आरोग्याच्या सोईसुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. वाडे, पाड्या, वस्यांबाबत रस्त्यांचीही सुविधा उपलब्ध करुन दिली पाहिजे. वनपट्टय्यांचे प्रलंबित प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करावी. आदिवासी बांधवांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आदिवासी समाजातील मुलांना चांगले शिक्षण मिळण्यासाठी आश्रमशाळांची संख्या वाढवावी, त्याचबरोबर वैद्यकीय सुविधा स्थानिक पातळीवर उपलबध होण्यासाठी आरोग्य केंद्रांची संख्या वाढवावी. रोजगारासाठी मनेरगा अतंर्गत सर्व रस्यांच्या कडेला वृक्षारोपण करण्यात यावे, जेणेकरुन रोजगाराबरोबरच पर्यावरणाचे संवर्धन होण्यास मदत होईल. रोजगारासाठी स्थानिक पातळीवर कुकुटपालन व्यवसायाकरीता पोल्ट्रींची संख्या वाढवावी. केंद्र व राजय सरकारच्या योजनेची माहिती अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत पोहचून त्यांना योजनेचा लाभ देण्यात यावा. आश्रमशाळेस महिन्यांतून एकदा भेट द्यावी. उपजिविकेसाठी वनोपज वाढीसाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. सोबतच वनपट्ट्यांचे वाटपही वेळेत करण्याच्या सुचना त्यांनी केल्या.

साक्री तालुक्यात शिक्षणाच्या अधिक सुविधा उपलब्ध होण्यासाठी एकलव्य स्कुलसाठी प्रस्ताव पाठवावा. तसेच आदिवासी समाजातील नागरीकांच्या जमीन हडप करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची सुचनाही त्यांनी केली. यावेळी त्यांनी साक्री तालुक्यातील लाटीपाडा धरणग्रस्तांच्या समस्यांवरही प्रशासनाशी चर्चा केली. याबाबतच्या प्रलंबित विषयांवर तातडीने कार्यवाही करण्याच्या सुचना त्यांनी दिल्या.

जिल्हा प्रशासनाचे केले कौतुक

दोन दिवशीय दौऱ्यात शिरपुर व साक्री तालुक्यातील आश्रमशाळा, आरोग्य केंद्र, अंगणवाडी येथे दिलेल्या भेटीवेळी व स्थानिकांशी चर्चा केल्यानंतर त्यांच्या प्रतिक्रिया तसेच आदिवासी बांधवांसाठी जिल्हा प्रशासन करीत असलेल्या विविध उपाययोजनांबाबत समाधान व्यक्त करुन अध्यक्ष आंतरसिंग आर्या यांनी जिल्हा प्रशासनाचे कौतुक केले.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. पापळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. नरवाडे, जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. धिवरे यांनी जिल्ह्यात आदिवासी बांधवांच्या विविध प्रश्र्न, त्यावरील उपाययोजना याबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी अध्यक्ष श्री. आर्या यांच्या हस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. नरवाडे आणि प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

बैठकीच्या सुरुवातीस वरीष्ठ अन्वेषक गोवर्धन मुंडे यांनी आयोगाची कार्यप्रणाली, दौऱ्याचा उद्देश आदिंबाबत माहिती दिली. तर संशोधन अधिकारी अंकितकुमार सेन यांनी आयोगाचे कार्यकक्षा, अधिकारी याबाबत माहिती दिली. उपस्थितांचे आभार प्रकल्प अधिकारी श्री. पाटील यांनी मानले.

'एक पेड माँ के नाम'अभियानांतर्गत वृक्षारोपण

'एक पेड माँ के नाम'अभियानांतर्गत राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाचे अध्यक्ष अंतरसिंह आर्य यांनी आज धुळे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण केले.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते चंद्रपूरच्या आशा बावणे 'राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कारा'ने सन्मानित

नवी दिल्ली, : आरोग्य क्षेत्रात नि:स्वार्थ वृत्तीने सेवा देणाऱ्या १५ परिचारिका आणि परिचारकांचा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्काराने गौरव करण्यात आला. या सोहळ्यात



महाराष्ट्रातील चंद्रपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील परिचारिका आशा बावणे यांना त्यांच्या २८ वर्षांच्या आरोग्यसेवेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले. एक लाख रुपये आणि प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. आशा बावणे यांनी विशेषतः आदिवासी आणि दुर्गम भागात आरोग्यसेवांमध्ये आपला ठसा उमटवला आहे. श्रीमती बावणे यांनी डायरियाच्या प्रकोपावर नियंत्रण, हज यात्रेत आरोग्य सेवा, तसेच राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. कोविड–१९ महामारीच्या काळात त्यांनी केलेल्या लस मोहिमेचे विशेष कौतुक झाले. या पुरस्कार सोहळ्यात केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री अनुप्रिया पटेल, आणि आरोग्य सचिव अपूर्व चंद्रा उपस्थित होते. राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार १९७३ पासून देण्यात येतात. २०२३ पर्यंत ६१४ परिचारिका आणि परिचारकांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेसाठी सन्मानित करण्यात आले आहे.

# तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांना गती देण्यासाठी तातडीने प्रस्ताव पाठवावा - उपमुख्यमंत्री अजित पवार



मुंबई, :– पुणे जिल्ह्याच्या हवेली तालुक्यातील घेरा, सिंहगड आणि प्रयागधाम, आंबेगाव तालुक्यातील अवसरी बुद्रुक, बारामती तालुक्यातील नीरावागज, खांडज, घाडगेवाडी तसेच इंदापूर तालुक्यातील बोरी या गावातील पाणीपुरवठा योजनांना गती देण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी या गावांना भेट द्यावी. भौगोलिक परिस्थिती आणि शाश्र्वत जलस्त्रोतांचा अभ्यास करुन सर्वोत्तम व्यवहार्य पर्याय सुचवावा. या गावांची पुढील ५० वर्षांची गरज लक्षात घेऊन पाणीयोजनांचा परिपूर्ण प्रस्ताव तातडीने पाठवावा. या योजनांचे काम तातडीने मार्गी लावण्यासाठी अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांना गती देण्यासाठी उपमुख्यंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, प्रधान सचिव सौरभ विजय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता प्रशांत भामरे आणि दूरदृश्यप्रणालीद्वारे पुणे जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले की, नवीन प्रस्ताव तयार करताना धरणातून बंद पाईपद्वारे पाणी आणणे किंवा नवीन साठवण तलाव बांधणे यासारख्या पर्यायांचाही विचार करावा. सध्याच्या अस्तित्वातील साठवण तलावाची दुरुस्ती, अशुद्ध पाणी गुरुत्वनलिका, अशुद्ध पाणी उद्धरणनलिका, पंपिंग मशिनरी, जलशुद्धीकरण केंद्र, अस्तित्वातील जल शुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती, शुद्ध पाणी ऊर्ध्वनलिका, उंच जलकुंभ, संतुलनटाकी, वितरण व्यवस्था, सौरऊर्जे सारख्या अपारंपरिक स्त्रोतांचा वापर, तसेच इतर अनुषंगिक कामांचा नव्या योजनेत समावेश करून, अंदाजपत्रकासह परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात यावा. या प्रस्तावाचा शासनस्तरावर अभ्यास करुन त्यास तातडीने प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. जिल्ह्यातील गावांच्या पाणीयोजनांचे काम तातडीने मार्गी लावण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

बारामती तालुक्यातील कांबळेश्र्वर येथे नव्या, पक्क्या साठवण तलावास मंजुरी

बारामती तालुक्यातील मौजे कांबळेश्र्वर येथील मातीच्या साठवण तलावातून कांबळेश्र्वर–शिरवली–शिरष्णे–लाटे–माळेवाडी या पाच गावांना पाणीपुरवठा करण्यात येतो. या साठवण तलावाचे बांधकाम जीर्ण झाले असल्याने मोठ्या प्रमाणावर गळती होते. या साठवण तलावाचे बांधकाम नव्याने आणि पक्क्या स्वरुपात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्दे शही उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी दिले.

अहमदनगर जिल्ह्याच्या तीन तालुक्यातील चार गावांच्या नळयोजनांना सुधारित मान्यता

अहमदनगर जिल्ह्याच्या श्रीगोंदा तालुक्यातील मौजे भावडी आणि टाकळी लोणार या दोन गावांतील, अकोले तालुक्यातील मौजे माळेगाव आणि कर्जत तालुक्यातील शिंपोरा या गावातील जलजीवन मिशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णयही घेण्यात आला.

# चंद्रपुरात १६ एकरवर अत्याधुनिक इनडोअर स्टेडियमची निर्मिती - पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार



चंद्रपूर, – सन २०३६ च्या ऑलिंपिकची तयारी करण्याकरिता केंद्र आणि राज्य शासन खेळाच्या विकासासाठी कटिबद्ध आहेत. त्याची सुरुवात गतवर्षी चंद्रपुरात राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा घेऊन करण्यात आली. ऑलिंपिकमध्ये यश मिळवायचे असेल तर सुसज्ज स्टेडियम असणे आवश्यक आहे. त्यासाठीच चंद्रपूर शहरात म्हाडाच्या १६ एकर जागेवर १३५ कोटी रुपये खर्च करून अत्याधुनिक इनडोअर स्टेडियमची निर्मिती करण्यात येत आहे, अशी माहिती राज्याचे वने मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

जिल्हा क्रीडा संकूल येथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बॅडमिंटन हॉलचे लोकार्पण करताना ते बोलत होते. यावेळी मंचावर जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, क्रीडा विभागाचे विभागीय उपसंचालक शेखर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश चांडक, क्रीडा अधिकारी विनोद ठिकरे, राहुल पावडे, डॉ. मंगेश गुलवाडे, ब्रिजभुषण पाझारे, विवेक बोढे यांच्यासह विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी, खेळाडू आणि नागरिक उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अत्याधुनिक बॅडमिंटन हॉलचे अधिकृत लोकार्पण झाले, असे जाहीर करून पालकमंत्री श्री मुनगंटीवार म्हणाले, भारताने ऑलिंपिकमध्ये सन १९०० मध्ये भाग घेतला. आज आपला देश हा १४० कोटी लोकसंख्येचा आहे. मात्र ऑलिंपिक स्पर्धेमध्ये आतापर्यंत आपल्याला केवळ ३५ पदक मिळाले आहेत. तेव्हाच आपण ठरवले की,ऑलिंपिकची तयारी छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्राने आणि वाघाची भुमी असलेल्या चंद्रपूर जिल्ह्याने केलीच पाहिजे. २०३६ मध्ये चंद्रपूरचा खेळाडू जेव्हा ऑलिंपिकमध्ये पदक मिळवेल, तेव्हा खरा आनंद होईल. त्यासाठी खेळाडूंनी मेहनत करावी.आपण खेळाडूंच्या पाठीशी कायम उभे राहू, अशी ग्वाही पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी दिली.

पुढे ते म्हणाले, पूर्वीच्या काळात खेळाच्या एवढ्या सोयीसुविधा नव्हत्या. आता मात्र जिल्ह्यात आणि शहरात जेव्हा उत्तम व्यवस्था निर्माण होते तेव्हा खूप आनंद होतो. आपल्या जिल्ह्यात क्षमतेची कमतरता नाही. सन २०१७ मध्ये आठ महिन्याच्या प्रशिक्षणातून आश्रम शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांनी २९ हजार फूट उंचीच्या एव्हरेस्टवर चंद्रपूरचा झेंडा फडकविला. खेळाच्या क्षेत्रात चंद्रपूर जिल्हा पुढे जावा, हाच आपला नेहमी प्रयत्न राहिला आहे. महाराष्ट्रातील तीन स्मार्ट सिंथेटिक ट्रॅक फक्त चंद्रपूर जिल्ह्यात आहेत. एक जिल्हा क्रीडा संकुल येथे, दुसरा बल्लारपूर क्रीडा संकुल येथे तर तिसरा स्मार्ट सिंथेटिक ट्रॅक सैनिक शाळेत आहे.

यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नामुळेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील बॅडमिंटन हॉलमध्ये चांगल्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू येथून निर्माण होईल व आपल्या चंद्रपूरचे नाव देशात उंचावले जाईल ,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. उपसंचालक शेखर पाटील म्हणाले, नागपूर नंतर क्रीडा विभागात सर्वाधिक काम चंद्रपूर जिल्ह्यात झाले आहे. पालकमंत्र्यांच्या पाठपुराव्यामुळेच दर्जेदार आणि मुलभूत सुविधा खेळाडूंसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यावेळी जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश चांडक यांनीसुध्दा मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविकात जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड यांनी, आंतरराष्ट्रीय स्तराच्या बॅडमिंटन हॉलचा प्रस्ताव जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी क्रीडा मंत्रालयाकडून मंजूर करून घेतला. क्रीडा संकुलाच्या विकासासाठी ५७ कोटींच्या प्रस्तावाला ही मान्यता मिळाली आहे. क्रीडा विभागासाठी भरीव तरतूद पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळेच शक्य झाली आहे, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन उत्तम आवळे यांनी तर आभार तालुका क्रीडा अधिकारी विनोद ठिकरे यांनी मानले.

प्रत्येक तालुक्यात अत्याधुनिक जीम

आरोग्याचा खर्च कमी करायचा असेल तर महाराष्ट्रातील सर्व तालुक्यात अत्याधुनिक स्टेडियम आणि जीम करण्याच्या सूचना आपण वित्तमंत्री असताना केल्या होत्या. बल्लारपूर, मूल, पोंभुर्णा येथे अत्याधुनिक जिमची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यातील १५ ही तालुक्यात अत्याधुनिक जीम तयार करण्यात येत आहे.

जिल्ह्यात विविध खेळांसाठी स्टेडीयमची निर्मिती

५७ कोटी खर्च करून चंद्रपूरचे स्टेडिअम उभारण्यात येत आहे. बल्लारपूर येथे साडेसहा कोटीचे स्टेडियम, एफडीसीएम येथे उत्कृष्ट स्टेडियम, कबड्डी करिता आणि कुस्तीसाठी जिल्ह्यामध्ये दोन छोटे छोटे अत्याधुनिक स्टेडियम आणि एस.एन.डी.टी. विद्यापीठात पारंपारिक खेळांसाठी नाविन्यपूर्ण स्टेडियम तयार करण्यात येत आहे. आणि भविष्यात नेमबाजी साठी अत्याधुनिक स्टेडीयम करण्याचा आपला मानस असल्याचे ना.मुनगंटीवार म्हणाले.

देखभाल दुरुस्तीकडे विशेष लक्ष द्यावे

जिल्हा क्रीडा संकूल येथे आज उद्घाटन झालेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बॅडमिंटन हॉलचा खेळाडूंनी चांगला उपयोग घ्यावा. तसेच या हॉलची देखभाल दुरुस्तीसाठी सर्वांनी लक्ष देणे गरजेचे आहे, अशा सुचना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.

राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा सत्कार

राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर विविध खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणा–या खेळाडूंचा यावेळी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यात आदर्श मास्टे, श्रेया इथापे, किंजल भगत, रुक्साना सलमाने, कृष्णा रोहणे यांच्यासह खेलो इंडिया प्रशिक्षक रोशन भुजाडे यांचाही समावेश होता.

# महाराष्ट्र शासनाचे १२ वर्षे मुदतीचे १ हजार ५०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई, : महाराष्ट्र शासनाच्या बारा वर्षे मुदतीच्या १ हजार ५०० कोटी रुपयांच्या रोख्यांची विक्री १६ मे २०१९ रोजीच्या अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून लिलावाने करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कार्यक्रमासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) कर्जरोखे रकमेच्या दहा टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र, एका गुंतवणूकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंतच वाटप करण्यात येईल. १७ सप्टेंबर, २०२४ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल, तर लिलावाचे बीडस् १७ सप्टेंबर, २०२४ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई–कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत. यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई–कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई–कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान १८ सप्टेंबर, २०२४ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

# २५ वर्षानंतर पाकची कबुली

जी गोष्ट पाकिस्तान आजवर नाकारीत आला ती गोष्ट पाकिस्तानने २५ वर्षानंतर का होईना अखेर मान्य केली. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल असीम मुनीर यांनी पाकिस्तानी सैनिक दिनाच्या निमित्ताने पाकिस्तानी सैनिकांना संबोधित करताना मान्य केली. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल असीम मुनीर यांनी पाकिस्तानी सैनिकांना संबोधित करताना १९९९ साली झालेल्या कारगिल युद्धात मारले गेलेल्या पाकिस्तानी सैनिकांच्या बलिदानाची आठवण काढत त्यांना श्रध्दांजली वाहिली आणि २५ वर्षापासून पाकिस्तान जी गोष्ट नाकारीत आलाय त्याची न कळत कबुली दिली.

१९९९ साली भारताचे तत्कालीन पंतप्रधान अटबिहारी वाजपेयी यांनी पाकिस्तानशी मैत्री करण्यासाठी मैत्रीचा हात पुढे केला. दोन्ही देशात पन्नास वर्षापासून सुरू असलेला तणाव कमी करण्यासाठी वाजपेयींनी प्रामाणिक प्रयत्न केले. दोन्ही देशांचे संबंध सुधरावेत म्हणून त्यांनी दिल्ली लाहोर बस सेवा सुरू केली . दोन्ही देशात सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले आणि कटुता कमी झाली असे वाटत असतानाच पाकिस्तानने आपला मूळ रंग दाखवला आणि भारताचा विश्र्वासघात केला. १९९९ च्या कडाक्याच्या थंडीत जम्मू काश्मीर मध्ये बर्फ पडत असल्याचा फायदा घेऊन कारगिल मधील उंचावर असलेल्या कारगिलमध्ये घुसखोरी करून बंकर उभारले आणि त्यात पाकिस्तानी सैनिकांना घुसवले.

त्यांनी कारगिलच्या बऱ्याच भागात अतिक्रमण केले आणि तो भूभाग बळकावत भारतीय सनिकांवर आक्रमण केले. भारतीयांसाठी हा मोठा धक्का होता कारण पाकिस्तान असा विश्र्वासघात करेल असे कोणालाच वाटले नव्हते शिवाय कारगिल मधील परिस्थिती भारतीयांसाठी अनुकूल नव्हती. शत्रुसैन्य उंचीवर असल्याने शत्रू सैन्याच्या गोळीबाराचा मुकाबला करत आल्या सैनिकांना पहाडावर चढावे लागत होते. भारतीय सैन्य अतिशय विपरीत परिस्थितीत शत्रूला धैर्याने तोंड देत होते पण परिस्थिती अनुकूल नव्हती अखेर केंद्र सरकारने हवाई दलाला पाचारण केले. हवाई दलाने लेझर बॉम्बने पाकिस्तानी सैनिकांचे बंकर उध्वस्त केले. कॅप्टन विक्रम बात्रा व त्यांच्या युनिटने मोठी मर्दुमकी गाजवून पाकड्यांना भारताबाहेर हुसकावून लावले.

दोन महिने चाललेल्या या युद्धात पाकिस्तान नामोहरम झाला. या युद्धात भारताचे अनेक जवान शहीद झाले. भारताने पाकड्यांना कारगिल मधून हुसकावून लावल्यावर भारतीय सैन्य पाकिस्तानमध्ये घुसेल अशी भीती वाटू लागल्यावर पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी थेट अमेरिका गाठत अमेरिकेला मध्यस्ती करण्याची विनंती केली. अमेरिकेच्या मध्यस्ती नंतर भारताने युद्ध थांबवले. या युद्धात पाकिस्तानची नाचक्की झाली पण पाकिस्तानने कारगिल मध्ये घुसखोरी करणारे पाकिस्तानी सैनिक नसून मुजाहिदीन असल्याची आरोळी ठोकली. आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तान कायम हेच सांगत आला की कारगिल मध्ये पाकिस्तानी सैन्य नव्हतेच भारताने मात्र त्याचा कायम प्रतिवाद करत घुसखोरी करणारे पाकिस्तानी सैन्यच असल्याची ठाम भूमिका घेतली. पाकिस्तान मात्र हे नाकारीत राहिला. पण म्हणतात ना सत्य केंव्हा ना केंव्हा तरी मान्य करावीच लागते.

आता २५ वर्षानंतर का होईना पाकिस्तानने सत्य मान्य केले. पाकिस्तान विश्र्वास घातकी आहे असे भारत आंतरराष्ट्रीय समुदायाला जे सांगत आलाय ते २५ वर्षानंतर का होईना पण खरे ठरले.

**श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे,९९२२५४६२९५**

# सुबोध कुमार गौतम बुद्धगया येथील अभ्यासू धम्म प्रचारक

विशेष प्रतिनिधी मुंबई –छत्रपती शिवाजी महाराज अंतर राष्ट्रीय विमानतळ सहार मुंबई येथे शुक्रवार दिनांक ९ सप्टेंबर २०२४ रोजी संध्याकाळी सहा वाजता म्यानमार बर्मा देशातील जागतिक किर्तीचे विपश्यनाचार्य पूज्य भंते सयाडो अशिन ओट्टामाथारा यांचा पूज्य भिखू संघ आणि भिख्खूनी संघ यांचे आगमन झाले त्यावेळी मुंबई मधील सर्व श्रद्धावान धम्म उपासक आणि धम्म उपासिका यांना विमानतळावर जंगी स्वागत करण्याची सुवर्ण



संधी उपलब्ध झाली.आदरणीय विप्पासना आचार्य भंते सयाडो अशिन ओट्टामाथारा,भिख्खूनी न्गूयेनशी थुओंग,भिख्खूनी थीन्हू थाओफन,भिख्खूनी था दाना यानी,भिख्खूनी धम्मा यसी,भिख्खूनी निला अये,भिख्खू थी हा पैंग,भिख्खू न्गूयेन ट्रूऑन्ग,भिख्खू बोधिनी यान,सुबोध कुमार गौतम,(बुद्ध गया) यांचे आगमन झाले.

तरुण तडपदार अभ्यासू धम्म उपासक सुबोध कुमार गौतम बुद्ध गया येथील धम्म प्रचारक,माझा प्रामाणिक कार्यकर्त्या गेली पांच वर्ष नियमितपणे माझ्या संपर्कात असतो.मुंबई तुन किंवा राज्यभरातून कोणी बुद्ध गयाला गेले. तर मी त्यांना सुबोध कुमारला भेटण्याचे सांगतो.सुबोध कुमार विदेशातील धम्म उपासक,भिख्खू संघाच्या स्वागतासाठी आणि कोणत्याही अडचणीवर मात करण्यासाठी सहकार्यासाठी महाबोधी महाविहार बुद्ध गया परिसरात संपर्कासाठी सज्ञ असतो.तो प्रत्येकाचे पंचशील शार्प बुद्ध वंदनेचे छोटे पुस्तक देऊन स्वागत करतो. म्यानमार बर्माच्या पुज्य भिख्खू संघा सोबत छत्रपती शिवाजी महाराज अंतरराष्ट्रीय विमानतळ सहार मुंबई येथे आला असता मी सागर रामभाऊ तायडे नी त्यांचे पुष्प गुच्छ देऊन मनःपूर्वक स्वागत केले.तो भिख्खू संघाच्या दौऱ्याची सविस्तर माहिती मला देत होता. त्यामुळेच मी मुंबई मधील अनेक श्रद्धावान धम्म उपासक आणि धम्म उपासिका यांना सोबत घेऊन विमानतळावर भिख्खू संघाचे जंगी स्वागत करण्यासाठी उपस्थित राहिलो.ही सुवर्ण संधी सुबोध कुमार गौतम मुळे मिळाली त्याचा त्याला खूप आनंद झाला. सागर तायडे यांस कडून

# श्रीसद्गुरु नारायण महाराजांचं निधन ही अध्यात्मिक, पुरोगामी चळवळीची हानी – उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भावपूर्ण आदरांजली

मुंबई, :– पुणे जिल्ह्याच्या पुरंदर तालुक्यातील श्रीक्षेत्र नारायणपूर येथील आदरणीय श्रीसद्गुरु नारायण महाराज यांचं निधन ही महाराष्ट्राच्या अध्यात्मिक, पुरोगामी, सुधारणावादी चळवळीची मोठी हानी आहे. अध्यात्माच्या माध्यमातून लोकजागृती, लोकजागृतीतून लोकचळवळ, लोकचळवळीतून सामाजिक सुधारणा, पुरोगामी विचार गावोगावी पोहोचवणाऱ्या श्रीसद्गुरु नारायण महाराजांचे विचार आणि सेवाकार्य सर्वजण मिळून पुढे नेणं. सामुदायिक शेती, सामुदायिक विवाह, सामुदायिक श्रमदान, व्यसनमुक्तीचे त्यांचे कार्य अखंडीतपणे कायम ठेवणं हीच श्रीसद्गुरु नारायण महाराजांना खरी आदरांजली ठरेल, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त करुन आदरांजली वाहिली आहे.

**मी लाडकी..**

योजनातशी चांगली
गोड बहीण लाडकी
अंमलबजावणी नीट
सक्षम होईलं लडकी
अर्ज कसे रे भरायचे
बावचळलेली नवखी
फायदा घे अज्ञानाचा
तोडूनखातील टवकी
गर्दी सर्वत्र उसळली
पाहूनि भरली धडकी
सावध रहावे बाबूंनी
यंत्रणा बनेल मोडकी
फाटलेल्या संसाराला
रक्कम नाही थोडकी
हातभार लागेभावाचा
जराशी सरेलं कडकी
मधल्या मध्ये मध्यस्थ
भरुन खातीलं पुडकी
चोराची फिरे टोळकी
पळवाटा सततहुडकी
काढत राहती चुकाचं
मंडळी काही किडकी
आडवे पडावे मार्गात
प्रवृत्ती काहीचीरडकी
कार्यक्षम व्हावी भली
योजना एक खिडकी
प्रबोधन महत्त्व जाणा
कच्ची ना राहो मडकी
खिरापती वाटत बसा
हातात राहीलं दिडकी
समाज कंकट भरलेले
ओळखा चाल दिडकी
विरोध ना सत्कार्यात
दावा जन सेवेत एकी
कल्याण हो भगिनींचे
मनगटी बांधली राखी

२)
**प्रदूषण ..**

गणेशोत्सव आला
रे आठवले प्रदूषण
पर्यावरणांस धोका
देऊ लागले दूषण
मी पर्यावरण पूरक
समजे स्वता भूषण
पुरोगामी विचारांचे
मिरवतातआभूषण
ध्वनीडेसिबल त्रास
वाढे वादांग घर्षण
प्लास्टिकसजावटी
वाटे खूप आकर्षण
असाकरावा उत्सव
नेते ठोकती भाषण
मंडळाशी करे चर्चा
मनमोकळेसंभाषण
असेकरावे विसर्जन
समस्याकळे भीषण
रे सगळेचसुचवणारे
सूचना त्या विलक्षण
नेत्यांच्या वाढदिवसां
करावे नीट परिक्षण
तेंव्हाहीउल्लंघन नहो
जागरूकताक्षणोक्षण
रॅलीसभा न् आंदोलन
करता कुणी उपोषण
नियम अन् कायद्याचे
तिथेमात्र का कुपोषण
काहीच नाही चुकीचे
जरुरी वसुधासंरक्षण
इतर उत्सवात सुध्दा
करावेप्रकृतीचे रक्षण

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६..**

# ठाकरेंमुळे भाजप नेत्यांनी हॉटेलमधून बाहेर काढले होते, सोमय्या आजही विसरले नाहीत; असे काय घडले होते?

मुंबई,: 'भ्रष्टाचाऱ्यांचे कर्दनकाळ' अशी किरीट सोमय्या यांची ओळखष्ठ केवळ राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्याच नेत्यांचे घोटाळे त्यांनी बाहेर काढले नाहीत तर सत्तेत एकत्र बसलेल्या शिवसेना नेत्यांनाही सळो की पळो करून सोडले. शिवसेनेसोबत घेतलेला पंगा आणि दुश्मनीची त्यांना मोठी किंमत चुकवावी लागली. खासदारकीचे तिकीट कापले गेलेच पण अमित शाह यांच्यासोबतच्या पत्रकार परिषदेतून त्यांना अपमानित होऊन बाहेर जावे लागले. ५ वर्षापूर्वीची त्यांची ही जखम आजही ताजी आहे, ज्याचा उल्लेख त्यांनी काल पक्षाची ऑफर नाकारताना पत्रात केला.

जोपर्यंत किरीट सोमय्या तिथे आहेत, तोपर्यंत मी पत्रकार परिषदेला येणार नाही, असा आक्रमक पवित्रा उद्धव ठाकरे यांनी त्यावेळी घेतला. सरशेवटी भाजप नेत्यांनी किरीट सोमय्या यांची समजूत काढली आणि त्यांना हॉटेलमधून जाण्यास सांगितले. पण उद्धव ठाकरेंनी सोमय्यांविरोधात एवढी आरपारची भूमिका का घेतली होती? ठाकरे कशामुळे दुखावले होते?

तर २०१७ साली मुंबई महापालिका निवडणूक झाली. भाजप-शिवसेना युतीची सत्ता राज्यात असूनही त्या निवडणुकीत दोन्ही पक्ष एकमेकांच्या विरुद्ध लढले. भारतीय जनता पक्षाची रणनीती ठरली की उद्धव ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या विरोधातली महापालिकेतली प्रकरणे बाहेर काढायची आणि त्याची जबाबदारी सोपवली गेली किरीट सोमय्या यांच्याकडे!

पक्षाने दिलेल्या जबाबदारीनुसार किरीट सोमय्या यांनीही उद्धव ठाकरे यांना थेट लक्ष्य करीत शिवसेना नेत्यांवर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप केले. शिवसेना म्हणजे कमिशनखोरांचा पक्ष आहे असे मुंबईकरांच्या मनावर बिंबवण्याचा सोमय्यांनी प्रयत्न केला. भाजपच्या आक्रमक प्रचाराला मुंबईकरांनी भरघोस प्रतिसाद दिला. मुंबईत ३१ वरून थेट ८१ वॉर्डात भाजपचं कमळ फुलले.

सोमय्यांच्या आरोपांनी इकडे ठाकरे घायाळ झाले होते. वर्षभरापासून ते संधीची वाटच पाहत होते. अखेर हो नाही म्हणता म्हणता २०१९ ची लोकसभा निवडणूक युती म्हणून लढायचा निर्णय ठाकरे आणि भाजप नेत्यांनी घेतला. तोच निर्णय जाहीर करण्यासाठी वरळीत प्रेस बोलावण्यात आली. पण इथे सोमय्या असतील तर मी येणार नाही, अशी भूमिका ठाकरेंनी घेतली आणि शेवटी भाजपला एक पाऊल मागे घ्यावे लागले. मुनगंटीवारांनी किरीट सोमय्या यांना हॉटेलबाहेर जाण्यास सांगितले. पक्षासाठी आपण ठाकरेंवर आरोप केले, पण त्याच पक्षाने आपल्याला अपमानास्पद वागणूक देऊन पत्रकार परिषदेतून बाहेर काढले, ही बोच सोमय्यांना लागून राहिली.

काल जेव्हा सोमय्यांवर विधानसभा निवडणुकीची जबाबदारी सोपविण्यात आली, त्यावेळी याच घटनेचा आवर्जून उल्लेख करून 'ती' जखम अजूनही भरलेली नसल्याचेच सोमय्यांनी सांगितले तसेच पक्षाची ऑफरही नाकारली!

# शरीरातील या ५ बदलावरुन ओळखा लिव्हरमध्ये जमा झालीय घाण, किडनी होईल डॅमेज

यकृत हा आपल्या शरीरातील एक महत्त्वाचा अवयव आहे. शरीरातील विषारी पदार्थ फिल्टर करण्यापासून ते शरीराच्या वाढीसाठी अन्नापासून पोषक घटक वेगळे करण्यापर्यंत हे काम करते. याव्यतिरिक्त, हे पित्त प्रथिने तयार करण्यास मदत करते जे अन्न पचवते, चांगले कोलेस्ट्रॉल आणि लाल रक्तपेशी तयार करते. परंतु प्रदूषण, धुम्रपान, खराब पाणी आणि अन्न यकृतामध्ये विषारी पदार्थ जमा होऊ लागतात. यकृतामध्ये विषाचे प्रमाण वाढल्याने अनेक गंभीर समस्या उद्भवू शकतात. यामुळे यकृताशी संबंधित आजार आणि यकृत खराब होण्याचा धोकाही वाढू शकतो. अशाच काही लक्षणांबद्दल सांगणार आहोत, जे सांगतात की, यकृतामध्ये विषारी पदार्थ जमा झाले आहेत आणि त्याला डिटॉक्सची आवश्यकता आहे.



पचन समस्या

जर तुम्हाला पचनाच्या समस्यांमुळे अनेकदा त्रास होत असेल तर ते यकृतामध्ये विषारी पदार्थ जमा होण्याचे लक्षण असू शकते. यकृत अन्न पचण्यास मदत करते. अशा परिस्थितीत, जर तुम्ही बद्धकोष्ठता, गॅस आणि ॲसिडिटीसारख्या समस्यांनी त्रस्त असाल तर हे लक्षण आहे की तुमच्या यकृताला डिटॉक्सची गरज आहे. यकृत डिटॉक्स करण्यासाठी, तुम्ही तुमचा आहार बदलला पाहिजे.

थकवा आणि आळस

नेहमी थकवा आणि सुस्त वाटणे हे देखील यकृतामध्ये विषारी पदार्थ जमा होण्याचे लक्षण असू शकते. वास्तविक, यकृतावरील अतिरिक्त भार वाढल्यामुळे हे घडते. जर तुम्हालाही जास्त कष्ट न करता थकवा आणि आळस येत असेल तर एकदा तरी तुमच्या डॉक्टरांशी संपर्क साधा.

पायांना सूज येणे

जर तुम्हाला तुमच्या पायात सूज आली असेल तर त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. यकृतातील विषारी द्रव्ये वाढल्यामुळे पायांमध्ये द्रव साचू शकतो. यामुळे पाय आणि घोट्याला सूज येऊ शकते. अशा परिस्थितीत तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि स्वत:ची तपासणी करून घ्यावी.

उलट्या आणि मळमळ

वारंवार उलट्या होणे आणि मळमळ होणे हे देखील यकृतातील विषारी द्रव्ये वाढल्याचे लक्षण असू शकते. याशिवाय यकृताच्या काही आजारांमुळे पोटदुखी आणि स्टूलमध्ये रक्त येऊ शकते. जर तुम्हालाही अशी लक्षणे दिसत असतील तर चुकूनही त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नका.

त्वचा खाज सुटणे आणि ऍलर्जी

यकृतामध्ये घाण वाढली की, त्याची चिन्हे आपल्या त्वचेवरही दिसतात. यकृतातील विषारी द्रव्ये वाढल्याने त्वचेमध्ये मोठ्या प्रमाणात पित्त जमा होऊ लागते. त्यामुळे त्वचेवर पुरळ उठून तीव्र खाज सुटते. त्यामुळे स्किन ॲलर्जीची समस्याही उद्भवू शकते.

# नखे कापण्याचे देखील शास्त्र असते, कोणत्या दिवशी काय फळ मिळते? जाणून घ्या

नखे वाढली की आरोग्याच्या दृष्टीकोनातून कापणे गरजेचे आहे. कारण नखात घाण जमा होते आणि जेवणाचे घास घेताना पोटात जाते. यामुळे संसर्ग होऊ शकतो. त्यामुळे नखांची निगा राखणंही तितकंच महत्त्वाचं आहे. हिंदू धर्मात प्रत्येक गोष्टींसाठी एक शास्त्र सांगितलं आहे. नखं कापण्याबाबतही शास्त्रात नियम आहेत. कोणती वस्तू कुठे असावी यापासून ते कोणत्या दिवशी काय करावं याचं महत्त्व सांगितलं गेलं आहे. घरातील वडीलधारी माणसं कायम नखं कापण्यापूर्वी आपल्याला आडकाठी करत असतात. मात्र त्याचं नेमकं कारण कधी कधी त्यांनाही माहिती नसते. अनेकदा त्यांच्याकडे परपंरागत ही माहिती आलेली असते. गुरुवार, शनिवार आणि मंगळवारी नखं कापू नये असे ते कायम सांगतात. त्याचबरोबर रात्रीची नखं कापण्यास वडिलधारी माणसं मज्जाव करतात. असं केल्यास देवी लक्ष्मी नाराज होते असं सांगितलं जातं. घरात आर्थिक अडचण येते असं देखील सांगितात. मग नखं कापण्यासाठी योग्य दिवस आणि वेळ कोणती? जाणून घेऊयात...



सोमवार- हा दिवस भगवान शंकर, चंद्र या ग्रहाला समर्पित आहे. ज्योतिषशास्त्रानुसार या दिवशी नखं कापल्याने तमोगुणातून सुटका होते.

मंगळवार- मारुतिरायाची या दिवशी मोठ्या भक्तिभावाने पूजा केली जाते. या दिवशी नखं कापण्यास वर्जित असतं. पण या दिवशी नखं कापल्यास कर्जातून सुटका होते.

बुधवार-हा दिवस गणपती बाप्पांचा असून नवग्रहातील बुधाचा निगडीत आहे. या दिवशी नखं कापल्याने अचानक धनलाभ होऊ शकतो. तसेच नोकरी आणि व्यवसायाचे नवे मार्ग आढळतात.

गुरुवार- गुरुवार हा भगवान विष्णु आणि देवगुरु बृहस्पतींशी निगडीत आहे. या दिवशी नखं कापल्याने मनुष्यात सत्व गुणांची वाढ होते.

शुक्रवार- हा दिवस देवी लक्ष्मी आणि शुक्र ग्रहाशी निगडीत आहे. हा दिवस नखं कापण्यासाठी सर्वोत्तम मानला जातो. या दिवशी नखं कापल्याने नात्यात गोडवा निर्माण होतो.

शनिवार- हा दिवस न्यायदेवात शनिशी निगडीत आहे. या दिवशी नखं कापू नयेत. यामुळे कुंडलीतील शनि कमकुवत होतो. यामुळे शारीरिक नुकसान आणि धनहानी होऊ शकते. तसेच मानसिक त्रासही सहन करावा लागू शकतो.

रविवार-ज्योतिषशास्त्रानुसार रविवारी नखं कापू नयेत. कारण यामुळे आत्मविश्वास कमी होतो.

# १५ सप्टेंबरपासून धावणार तिसरी वंदे भारत एक्स्प्रेस

नागपूर : देशाचे भौगोलिक केंद्र असणाऱ्या नागपूरसाठी केंद्र सरकारने आणखी एक मोठं गिफ्ट दिलेय. लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी देशातील विविध रेल्वे मार्गावर १० वंदे भारत एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. १५ सप्टेंबरला पंतप्रधान मोदी नागपूर - सिकंदराबाद वंदे भारत रेल्वेचा शुभारंभ करणार आहेत. त्यामुळे प्रशासनाची जोरदार तयारी सुरू आहे. तर नागपूरकरांनाही या रेल्वेचा मोठा फायदा होणार आहे. नागपूर - सिकंदराबाद या गाडीमुळे नागपूरवरून धावणाऱ्या वंदे भारतची संख्या तीन होणार आहे. या आधी नागपूर-बिलासपूर आणि नागपूर-इंदोर या वंदेभारत ट्रेन सुरू झाल्या आहेत. या दोन्ही गाड्यांना प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. नागपूर ते सिकंदराबाद रेल्वे मार्गावर प्रवाशांची गर्दी जास्त आहे. त्यामुळे या एक्स्प्रेसची गरज होती. ही गोष्ट लक्षात घेऊन या मार्गावर मंगळवार सोडून आठवड्यातील सहा दिवस वंदे भारत ट्रेन चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नागपूर ते सिकंदराबाद वंदे भारत एक्स्प्रेस सकाळी ५ वाजता नागपूरहून निघणार आहे. ती दुपारी १२:१५ वाजता सिकंदराबादला पोहचणार असल्याची माहिती आहे. त्याचप्रमाणे सिकंदराबाद येथून दुपारी १ वाजता ही गाडी सुटेल आणि रात्री ८:२० वाजता नागपूरला पोहचणार आहे. ही गाडी सेवाग्राम, चंद्रपूर, बल्लारशाह, रामागुंडम, काजीपेठला थांबणार असून या गाडीत १६ कोच असतील. ५७८ किलोमीटरचे अंतर ही गाडी ७:१५ ते ७:२० तासात पूर्ण करेल. या गाडीचा वेग प्रती तास साधारणत: ८० किलोमीटर आणि कमाल वेग १३० किलोमीटर राहणार असल्याची माहिती आहे. गेल्या काही काळापासून नागपूर-पुणे वंदे भारत ट्रेन चालविण्यात यावी, अशी मागणी होत आहे. नागपूर ते पुणे हे अंतर बघता चेअर कार तिथे शक्य नाही. म्हणून स्लीपर कोच सुरू करण्याची मागणी होती. ही ट्रेन सुद्धा लवकरच सुरु करण्यात येईल, असे सांगितले जात आहे. मात्र त्याबाबत अजूनही अधिकृत माहिती आलेली नाही. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये नागपूर ते सिकंदराबाद वंदे भारत ट्रेनविषयी अधिक चर्चा सुरू आहे.



## सोयाबीन, कापसासह ...

(पान २ वर) ...जोतीराव फुले शेतकरी सन्मान योजनेंतर्गत कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्यातील अडथळे सप्टेंबरअखेरपर्यंत दूर करण्यात येतील. केंद्रीय पणन, सहकार, कृषीमंत्र्यांची भेट घेऊन राज्यातील शेतकऱ्यांच्या मागण्या आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावले जातील, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित शेतकरी प्रतिनिधींच्या बैठकीत दिली. राज्यातील शेतकरी, शेतमजूरांच्या प्रश्नांसदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला राज्याचे सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, पणनमंत्री अब्दुल सत्तार, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, वित विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी, प्रधान सचिव रणजितसिंह देओल, कृषी विभागाच्या सचिव जयश्री भोज आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह शेतकरी नेते रविकांत तुपकर आणि शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर बंदी न घालण्याचा निर्णय घेतला आहे.

# राशी भविष्य १२ सप्टेंबर २०२४

मेष : शुभ रंग : काळा, शुभ दिशा : दक्षिण
मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे. हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य.

वृषभ : शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : उत्तर
एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य. घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल.

मिथुन : शुभ रंग : निळा, शुभ दिशा : दक्षिण
मुलांच्या बाबतीत कठोर निर्णय घ्यावे लागतील. अपेक्षित मित्रांची मदत मिळेल. भावनेपेक्षा कर्तव्य महत्त्वाचे ठरेल.

कर्क : शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पश्चिम
धंदा व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. घरामध्ये छोट्या समारंभाच्या निमित्ताने प्रियजनांची गाठभेट होईल.

सिंह : शुभ रंग : लाल, शुभ दिशा : उत्तर
एकत्रित होणाऱ्या सहली आनंददायक ठरतील. मुलांच्या हट्टापायी चैनीच्या वस्तूसाठी खर्च करावा लागेल.

कन्या : शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम
मनाचा दाखविलेला मोठेपणा नातेसंबंधातील तेढ कमी करणारा ठरेल. विचार बदलतील.

तुळ : शुभ रंग : काळा, शुभ दिशा : उत्तर
एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने तुमच्यावर एकप्रकारचा दबाव येईल.

वृश्चिक : शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पूर्व
आपल्या भोळ्या स्वभावाचा इतर गैरफायदा तर घेत नाही ना याकडे लक्ष द्या.

धनु : शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पश्चिम
संततीच्या दृष्टीने येणाऱ्या शुभवार्ता अभिमानास्पद ठरतील. मात्र, त्यांचे आरोग्याचे प्रश्नाबाबत वेळीच लक्ष द्या.

मकर : शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : दक्षिण
इतरांना न जमणारी कामे तुम्ही यशस्वीरीत्या हाताळाल. त्यामुळे वरिष्ठांची आपल्यावर मर्जी राहील.

कुंभ : शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : दक्षिण
आपल्या लहानसहान इच्छा:आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल.

मीन : शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पश्चिम
कोणताही टोकाचा विचार किंवा अतिरेकी कृती आपल्याच पायावर दगड पाडून घेणारी ठरेल.

# इतिहासात आजचा दिवस १२ सप्टेंबर

अंतरराष्ट्रीय

१८७८ – १८६ टन वजनाचा ३५०० वर्षे जना ओबेलिस्क ( वरती निमुळता होत गेलेला दगडी स्तंभ) अलेक्झांड्रियातून इंग्लंडला नेण्यात आला. तो लंडनला उभारण्यात आला. याला 'क्लिओपात्राज् निडल्' म्हणतात. मात्र, त्याचा क्लिओपात्राशी कसलाही संबंध नाही.
१९४० – फ्रान्समध्ये लास्को या गुहांचा योगायोगाने शोध. या गुहांत आदिमानवाने चितारलेली रंगीत चित्रे असून, त्या गुहा आता जागतिक ठेवा मानल्या जातात.
१९४० – ब्रिटिश विमाने बटाटापिकावर विमानातून किडे टाकतात, असा दावा जर्मनीने केला.
१९४१ – रशियन आघाडीवर हिवाळ्याची सुरुवात. हा हिवाळा फारच भीषण होता. तो 'जनरल विंटर' या नावाने प्रसिद्ध आहे. या हिवाळ्यात थंडीने काकडून जेवढे जर्मन सैनिक मेले, तेवढे रशियांनानीही मारले नाहीत.
१९४२ – इटालियन युद्धकैद्यांना घेऊन निघालेले 'लॅकोनिया' हे जहाज जर्मनांनी बुडवले. त्यातील ८०० युद्धकैदी बुडून मेले. १००० युद्धकैदी वाचले.
१९४३ – ओट्टो स्कोर्झेनी या जर्मन कमांडोने अतिशय धाडसाने कैदेतल्या मुसोलिनीस पळवून नेले.
१९४४ – अमेरिकी सैन्य आखेनजवळ जर्मनीत शिरले.
१९४५ – ॲडमिरल माउंटबॅटननी जपानी सैन्याची शरणागती स्वीकारली.

राष्ट्रीय

१६८६ – औरंगजेबाने आदिलशाहीचा शेवट केला.
१७२७ – थोरल्या बाजीरावांनी निजामाविरुद्ध मोहीम सुरू केली.
१७८६ – लॉर्ड कॉर्नवॉलिस यांची भारताचे गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक.
२००२ – भारताचा हवामान अभ्यास उपग्रह मेटसॅट प्रक्षेपित.
२००२ – भारतातील चिल्का सरोवराची आंतरराष्ट्रीय पर्यावरण पारितोषिकासाठी निवड.
२००३ – कुक्का पारे या अतिरेकीविरोधक विधानसभा सदस्याची काश्मीरमध्ये हत्या.
२००७ – आसामच्या पूरात २२ पेक्षा अधिक मुले वाहून गेली.
२००७ – भारताने पाणबुडीतून मारा करता येणाऱ्या आंतरखंडीय क्षेपणास्त्र 'सागरिका'ची चाचणी घेतली.

जन्म

१४९२ – लॉरेन्झो दि मेदिची दुसरा.
१४९४ – फ्रांसिस पहिला, फ्रांसचा राजा.
१५७५ – हेन्री हडसन, इंग्लिश शोधक.
१८१८ – रिचर्ड गॅटलिंग, मशिनगनचा निर्माता.
१८९९ – विभूतिभीषण बंदोपाध्याय, कादंबऱ्याचे लेखक.
१९१३ – जेसी जेम्स, अमेरिकन धावपटू.
१९३२ – वकार हसन, पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू.
१९३७ – वेस्ली हॉल, वेस्ट इंडीझचा क्रिकेट खेळाडू.
१९४८ – मॅक्स वॉकर, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
१९७७ – नेथन ब्रॅकेन, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.

निधन

१२१३ – पीटर दुसरा, अरागॉनचा राजा.
१३६२ – पोप इनोसंट सहावा.
१६१२ – व्हासिली चौथा, रशियाचा झार.
१६८३ – अफोन्सो सहावा, पोर्तुगालचा राजा.
१९१८ – जॉर्ज रीड, ऑस्ट्रेलियाचा चौथा पंतप्रधान.
१९७१ – जयकिशन, संगीतकार.
१९९२ – मल्लिकार्जुन मन्सूर, ज्येष्ठ भारतीय गायक.
१९९३ – रेमंड बर, अमेरिकन अभिनेता.
२००३ – जॉनी कॅश, अमेरिकन संगीतकार, गायक.

प्रतिवार्षिक पालन

राष्ट्रीय दिन – केप व्हर्दे.
राष्ट्रीय क्रांती दिन – इथियोपिया.

## यंदा गौरींमध्ये पुर्व नक्षत्र आल्याने मोठा ओवसा, कोकणात आहे खुप महत्त्व

डोंबवली : दरवर्षी गणपतीत कोकणात ओवसा साजरा केला जातो. ओवसा म्हणजे ओवळणे असा खरा अर्थ. कोकणात गणपतीत माहेर वाशिनीचा ओवसा केला जातो. यंदा गौरी गणपतीत पूर्व नक्षत्र आल्यामुळे नविन वधूचा ओवसा आहे. तो साधारण दोन ते तीन वर्षांनी येतो. याबद्दलच आपल्याला परेश पाटील गुरुजींनी माहिती दिली आहे. कोकणात ओवस्याला खूप महत्व आहे. या ओवस्यामध्ये गणपती बाप्पा सोबत येणाऱ्या गौराईला सूप दिला जातो.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894